सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN
978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २२ • अंक ०४ • जुलै २०२६ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## सहकार चळवळ आणि साखर उद्योगाला नवसंजीवनी देणार - अमित शहा



## सहकार सप्ताहानिमित्ताने सहकारातील विविध दिग्गजांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव









गुंतवणूकदारांनी

## सरकारी कर्जरोख्याला प्राधान्य द्यावे

- आरबीआय संचालक मराठे



'सहकार सुगंध'च्या २५व्या पुस्तकाचे प्रकाशन


दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
32
भाळी चंदनाचा टिळा,
तुळशी माळ गळा
नित्य आम्हा लागल
पांडुरंगाचा लळा
आषाढी एकादशी
निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
५००० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
जनमानसाचा विश्वास... धरमपेठ महिला!
गोल्ड लोन
व्याजदर 0.90% प्रति माह
• योजना सर्व शाखेत उपलब्ध
9822272947
आनंदी क्षणांचा सोबती...
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
। वाढदिवस । मुंज । साक्षगंध ।
सांस्कृतिक कार्यक्रम । कॉन्फरन्स
7888002023
BANKING P.O
180 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Launch Your Banking Career For FREE!
8055026129
Join the Dharampeth Mahila Society
Probationary Officer Programme (P.O)
Enroll Now & Grab The Opportunity
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2335 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
मुख्य कार्यालय प्लॉट न. ४२-अ, सीताराम भवन, राम नगर चौक, शिवाजी नगर, नागपूर-१०
फोन: 0712-2524337 / 2520303 | ई-मेल : info@dpmahila.com


राजर्षी शाहू
र. नं. 819
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा
• ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
• बँको पुरस्कार प्राप्त संस्था
• FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
• मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा. ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
आषाढी एकादशी
सर्व भाविक भक्तांना तसेच
सर्व सभासद बंधू भगिनींना
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक: संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष - राजर्षी शाहू मल्टीस्टेट
को. ऑप क्रेडीट सोसायटी बुलढाणा
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
LOAN सेवा सुविधा
GOLD LOAN उपलब्ध
LOCKERS सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
DEPOSIT सुविधा
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
शाहू- पे
SHAHU PAY
CORE बँकिंग
NET बँकिंग
MOBILE बँकिंग
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
राजर्षी शाहू संस्थेची वैशिष्ट्ये -
• एकूण ६९ शाखेचा विस्तार
• २००० कोटींचा व्यवसाय
• १,५०,००० सभासद संख्या
• 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था.
• महिला बचत गटाच्या माध्यमातून ७५ हजार महिलांना २५० कोटी रुपयांचे कर्ज वाटप.
• १०५ कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
+91-93599 41853
rajarshishahumultistate.com
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
टीजेएसबी चे व्यावसायिक कर्ज
प्रत्येक महत्वाकांक्षेसाठी
शून्य परतफेड शुल्क
डॉक्टर, सीए, वकील आणि इतर अभियंता
त्वरित मंजुरी
*अटी व शर्ती लागू
www.tjsb.bank.in | ✆ : 022-48897210


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
ISO
ISO
CMMI
netwin
SCAN & PAY
BHIM UPI
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरु करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in

# जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

## जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट खरेदीसाठी
किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

Processing Fee **0%**

Rate of Interest **7.50%*** Onwards





## जनसेवा शैक्षणिक कर्ज

देशांतर्गत तसेच परदेशातील
शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध.

Processing Fee **0%**

Rate of Interest **8.90%*** Onwards

* अटी लागू

**मुख्य कार्यालयः** प्लॉट क्र. १४, हडपसर इंड. इस्टेट, पुणे १३.

**फोनः** ०२०-२६७०४३०० ते ०४ (५ लाईन्स)
www.janasevabankpune.bank.in

|| बिना संस्कार नहीं सहकार ।
बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

जुलै २०२६ (वर्ष २२, अंक ०४)

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**वर्गणीचे दर**

**वार्षिक वर्गणी : रु. ७००/– फक्त**
**त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/– फक्त**
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**QR कोड**

**कृपया QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे. किंवा खालील बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी.**

**A/c Name**

**A/c Name :**
**Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**सहकार सुगंध कार्यालय**

**ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,**
**५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर,**
**गणेशमळा, सिंहगड रोड,**
**पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३**
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक –** भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004.
**Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# सहकाराच्या नव्या पर्वाची घोषणा

देशातील सहकार चळवळीला नवी दिशा देण्याचा प्रयत्न गेल्या पाच वर्षांत सातत्याने होत आहे. जुलै २०२१ मध्ये केंद्रात स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरु झाले आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सहकार मंत्रालयाचा कारभार हाती घेतला. सहकार मंत्रालयाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्ताने त्यांच्या भाषणातील घोषणा या केवळ राजकीय विधानांपुरत्या मर्यादित नसून, भारतातील सहकार क्षेत्राच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण संकेत देणाऱ्या आहेत.

सहकार मंत्रालयाची स्थापना 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेवर झाली. त्यानंतर प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS), सहकारी बँका, दुग्ध, मत्स्य, साखर, विपणन आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या. आता सहकाराच्या व्याप्तीचा विस्तार करत सहकारी जीवन विमा कंपनी स्थापन करण्याची घोषणा आणि भारत टॅक्सीसारख्या सहकारी सेवा देशभर विस्तारण्याचा निर्णय हा सहकाराला सेवा क्षेत्रातही नवे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. हे सहकार चळवळीच्या दृष्टीने अत्यंत आश्वासक असे पाऊल आहे.

भारतातील सहकारी संस्था केवळ आर्थिक व्यवहारांचे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन राहिल्या आहेत. सहकार मंत्रालयाने गेल्या ५ वर्षात तंत्रज्ञान, व्यावसायिक व्यवस्थापन आणि पारदर्शकता यांवर दिलेला भर स्वागतार्ह आहे. सहकारी जीवन विमा कंपनीची संकल्पना विशेष लक्षवेधी आहे. आज विमा क्षेत्रात खाजगी आणि सार्वजनिक कंपन्यांचे वर्चस्व आहे. सहकारी तत्त्वावर चालणारी विमा संस्था ग्रामीण आणि मध्यमवर्गीय कुटुंबांपर्यंत कमी खर्चात आणि विश्वासार्ह सेवा पोहोचवू शकते. मात्र त्यासाठी सक्षम भांडवल, व्यावसायिक जोखीम व्यवस्थापन, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि कठोर नियामक पालन अनिवार्य असेल, शिवाय स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी त्यापद्धतीची व्यवस्था लागेल.

'भारत टॅक्सी'सारख्या उपक्रमातून डिजिटल अर्थव्यवस्थेत सहकारी मॉडेलचा प्रवेश होत असल्याचे दिसते. आज प्लॅटफॉर्म इकॉनॉमीमध्ये काही मोठ्या कंपन्यांचे वर्चस्व आहे. चालक किंवा सेवा पुरवठादार यांच्याच मालकीचे सहकारी व्यासपीठ उभे राहिले तर उत्पन्नाचे अधिक न्याय्य वितरण शक्य होऊ शकते. ही संकल्पना यशस्वी झाली तर इतर अनेक सेवा क्षेत्रांसाठीही ती आदर्श ठरू शकते, जे सहकार चळवळीचे मोठे बलस्थान ठरेल. तरुण पिढीला सहकार चळवळीत आकर्षित करण्यासाठी असे नवनवीन प्रयोग निश्चितच उपयोगी ठरतील.

केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी राज्यांच्या सहकार क्षेत्रात केंद्राने हस्तक्षेप केल्याची कोणत्याही राज्याने तक्रार केली नसल्याचेही स्पष्ट केले. सहकार हा राज्यांच्या कार्यक्षेत्राशी निगडित विषय असल्याने केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. सहकाराची खरी ताकद ही विकेंद्रीकरणात आहे. त्यादृष्टीने सहकार चळवळीत आमूलाग्र बदल व्हायला हवेत. सहकारासाठी होत असलेल्या या प्रयत्नांचे यश हे प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. सहकार क्षेत्रातील प्रत्येक संस्था, प्रत्येक सभासद आणि प्रत्येक व्यवस्थापकाने पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नवोपक्रम यांचा स्वीकार केला तरच 'सहकारातून समृद्धी' हे ध्येय वास्तवात उतरेल. आजची प्रकर्षाने जाणवणारी गरज आहे, ती म्हणजे राजकारणापलीकडे जाऊन सहकाराला आधुनिक, स्पर्धात्मक आणि सर्वसमावेशक आर्थिक चळवळ म्हणून विकसित करण्याची. अमित शहा यांच्या अलीकडील घोषणांनी त्या दिशेने एक नवा अध्याय सुरू केला आहे; आता त्याचे यश देशातील सहकारी संस्थांच्या कार्यक्षमतेवर आणि संचालक, व्यवस्थापनाच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे. सहकार चळवळीला अच्छे दिन येण्याचा हा काळ आहे, तो सहकारातील कार्यकर्त्यांनी अधिक परिणामकारक पद्धतीने प्रयत्नपूर्वक प्रत्यक्षात आणावा तरच 'सहकारातून समृद्धी'कडे जाता येईल.

जय सहकार!



संपादकीय...



**कल्लापाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन करताना अमित शहा**

# साखर उद्योगाला नवसंजीवनी देण्यासाठी पुणे आणि कोल्हापूरमध्ये दोन प्रकल्प उभारणार - केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा

**कोल्हापूर** – महाराष्ट्रातील साखर उद्योगाला आधार देण्यासाठी इथेनॉलसह अन्य उत्पादने तयार करण्यासाठी पुणे आणि कोल्हापूरमध्ये दोन प्रकल्प उभारण्यात येणार असून त्यासाठी प्रत्येकी १५०० कोटी आर्थिक निधीची गुंतवणूक करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी ही माहिती सांगितली. या प्रकल्पामुळे राज्यातील साखर उद्योगाला मोठी ताकद मिळणार आहे.

इचलकरंजी येथे झालेल्या महायुतीच्या जाहीर सभेत बोलताना त्यांनी ही माहिती सांगितली. ते म्हणाले, जे साखर कारखाने, इथेनॉलसह अन्य उत्पादने तयार करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी एकत्र येऊन अशी उत्पादने तयार करण्यासाठी १५०० कोटी रुपये खर्चाचा सहकार तत्त्वावरील प्रकल्प कोल्हापूर जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. पुण्यात बंद पडलेल्या नॅशनल को-ऑप. हेवी इंजिनीअरिंगचे पुनरुज्जीवन करून त्या ठिकाणी वरील उत्पादने तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्र सामुग्रीचे उत्पादन करण्यात येणार आहे. यासाठी १५०० कोटींच्या आर्थिक निधीची गुंतवणूक करण्यात येणार आहे. यामधून राज्यातील साखर उद्योगाला मोठ्या प्रमाणावर ताकद मिळणार आहे. हे दोन्ही प्रकल्प येत्या तीन महिन्यांच्या कालावधीत सुरू करण्यात येणार आहेत.

**※ बँकेच्या प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन –**

सुरूवातीला आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन आणि कल्लाप्पा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना असे नामकरण करण्यात आले. यावेळी बँक अध्यक्ष स्वप्नील आवाडे तसेच माजी मंत्री प्रकाश आवाडे आदी उपस्थित होते.

---

# सहकार क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला गती मिळणार

**नवी दिल्ली** – सहकार क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला गती देण्यासाठी राष्ट्रीय सहकारी डेटाबेस, सहकारी रँकिंग फ्रेमवर्क, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि डेटावर आधारित देखरेख यंत्रणा सक्षम करण्यावर चर्चेत भर देण्यात आला. राष्ट्रीय सहकार धोरण- अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील धोरण अंमलबजावणी आणि देखरेख समितीची पहिली बैठक येथे झाली. अध्यक्षस्थानी सहकार मंत्रालयाचे सचिव आणि समितीचे अध्यक्ष डॉ. आशिषकुमार भुतानी होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सहकार से समृद्धी' या संकल्पनेमुळे प्रेरित होऊन केंद्रीय गृहमंत्री,तसेच सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाने सहकार क्षेत्राला बळकट आणि आधुनिक करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. त्याच संदर्भात ही बैठक झाली. समितीने राष्ट्रीय सहकार धोरण-२०२५च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, संस्थात्मक बळकटीकरण, केंद्रीय मंत्रालये, विभाग, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आणि राष्ट्रीय महासंघ, सहकारी संस्था यांच्याद्वारे डिजिटल परिवर्तन, क्षमतेत वाढ, सदस्यत्त्व विस्तार आणि सहकार क्षेत्र प्रणीत समावेशक आणि शाश्वत आर्थिक विकासासाठी समन्वयित कृती यावर विशेष लक्ष केंद्रित करून कृती आराखड्यावर चर्चा केली.

भुतानी यांनी राष्ट्रीय सहकार धोरण - २०२५ची उद्दिष्टे तळागाळापर्यंत नेण्यासाठी सर्व संबंधितांना एकत्र काम करण्याचे आवाहन केले. बळकट, पारदर्शक आणि आधुनिक सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा देतील आणि विकसित भारत २०४७ च्या ध्येयपूर्तीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतील, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सहकार धोरण-२०२५ सहकारी संस्थांना पारदर्शक, तंत्रज्ञानात सक्षम, व्यावसायिकरीत्या व्यवस्थापित आणि सदस्याभिमुख आर्थिक संस्था बनवण्यासाठी व्यापक रूपरेषा प्रदान करत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

समितीने चर्चेदरम्यान राष्ट्रीय सहकार्य धोरण-२०२५ चे सहा धोरणात्मक स्तंभ, तसेच विविध मंत्रालये आणि विभागांशी समन्वित कृती आराखड्यावर चर्चा केली. या बैठकीत सहकार क्षेत्रातील नवोन्मेष, स्टार्टअप संस्कृतीला चालना, कौशल्य विकास आणि सहकार क्षेत्रात तरुण नेतृत्त्व निर्माण करण्याबाबतही चर्चा झाली. सहकार क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला गती देण्यासाठी राष्ट्रीय सहकारी डेटाबेस, सहकारी रँकिंग फ्रेमवर्क, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि डेटावर आधारित देखरेख यंत्रणा सक्षम करण्यावर या चर्चेत भर देण्यात आला.



**'सरकारी कर्जरोखे' पुस्तकाचे प्रकाशन करताना मध्यभागी आरबीआर संचालक सतीश मराठे, उजवीकडे विद्याधर अनास्कर, भरत पाठक, तर डावीकडे भालचंद्र कुलकर्णी, मुकुंद लेले, दीपक पटवर्धन आणि लेखक जयंत काकतकर.**

# सर्वसामान्य गुंतवणूकदारांनी सरकारी कर्जरोख्याला प्राधान्य द्यावे आरबीआय संचालक सतीश मराठे यांची सूचना

## 'सरकारी कर्जरोखे - बँका, पतसंस्था सर्वसामान्यांसाठी गुंतवणुकीचा उत्कृष्ट पर्याय' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे** - देशाची अर्थव्यवस्था सक्षम असून प्रति व्यक्ती उत्पन्नात वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्य जनतेने गुंतवणुकीला प्राधान्य देण्याची गरज असून त्यामध्ये सरकारी कर्जरोख्याला प्राधान्य द्यावे, अशी सूचना आरबीआय, नाबार्ड संचालक आणि सहकार भारती संस्थापक सदस्य सतीश मराठे यांनी केली आहे.

सहकार सुगंध प्रकाशित आणि जयंत काकतकर लिखित 'सरकारी कर्जरोखे - बँका, पतसंस्था आणि सर्वसामान्यासाठी गुंतवणुकीचा एक उत्कृष्ट पर्याय' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके, राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष दीपक पटवर्धन, सहकार भारती सहकारी बँक राष्ट्रीय प्रकोष्ठ प्रमुख अभय माटे, सांगली सहकारी बँक अध्यक्ष गणेश गाडगीळ, ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार भरत फाटक, लेखक जयंत काकतकर, 'सकाळ मनी'चे संपादक मुकुंद लेले, 'सहकार सुगंध मासिक'चे संपादक भालचंद्र कुलकर्णी, पीपल्स सहकारी बँक माजी अध्यक्ष सुभाष मोहिते व्यासपीठावर होते. या विषयावरील मराठी भाषेतील हे पहिले पुस्तक आहे.

**※ पुस्तकाचे अन्य भाषांत भाषांतर व्हावे-**

हे पुस्तक मराठी बरोबर हिंदी, इंग्रजी, गुजराती आणि कन्नड भाषेत प्रकाशित करण्यात यावे अशी सूचना करून ते म्हणाले, सध्याची अर्थव्यवस्था पाहता नजीकच्या काळात सुधारणा होणे शक्य आहे. निर्यातीला चालना मिळेल, उत्पादनक्षमता वाढणार आहे परिणामी देशाची प्रतिमा उंचावणार आहे. मध्यंतरीच्या काळात काही अडथळे निर्माण झाले होते. पण आता स्थिति सुधारत आहे. नव्याने स्टार्टअप वाढत असल्याने रोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात व्यापक होणार आहेत, असे ते म्हणाले.

**※ पुस्तकामुळे आर्थिक साक्षरता होण्यास हातभार -**

अनास्कर यांनी सांगितले, की सर्वसामान्य गुंतवणूकदारांचा कल हा कर्जरोख्याकडे वाढत आहे आणि लेखकाच्या समोर सर्वसामान्य गुंतवणूकदार आहे. त्यामुळे हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठरणार आहे. एका अर्थाने गुंतवणुकीसाठी योग्य मार्गदर्शन पुस्तकाच्या माध्यमातून होणार आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या पुस्तकामुळे आर्थिक साक्षरता होण्यास हातभार



विद्याधर अनास्कर



ॲड. दीपक पटवर्धन



मुकुंद लेले



भरत फाटक

लागणार आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञान आणि व्यवसाय याला चालना मिळणार आहे. महागाईचा वाढता दबाव आणि तुटीची स्थिती लक्षात घेता हे पुस्तक नक्की मार्गदर्शक ठरणार आहे.

**※ पुस्तकामुळे पतसंस्था चळवळीला नवा दृष्टिकोन –**

राज्यात पतसंस्था चळवळीची व्याप्ती मोठी असली, तरी केवळ पतसंस्थांचा ५ टक्के पैसा कर्जरोख्यात आहे, असे नमूद करून पटवर्धन यांनी सांगितले, की या पुस्तकामुळे पतसंस्था चळवळीला नवा दृष्टिकोन मिळणार आहे. सहकारात संस्कार रुजविण्याचे काम सहकार भारतीने अव्याहतपणे केले आहे. त्याचा एक भाग म्हणजे २५ पुस्तकांचा खजिना वाचकांना उपलब्ध झाला आहे.

**※ जागरूकता वाढणार आहे –**

संपादक लेले यांनी पुस्तकाची आवश्यकता प्रतिपादित केली. ते म्हणाले, कर्जरोखे हा लोकप्रिय असा विषय नाही. त्यापेक्षा आज शेअरची चर्चा अधिक होते. या पुस्तकाच्या निमित्ताने कर्जरोख्याची चर्चा व्यापक होण्यास हातभार लागणार आहे. पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांना विविध प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. परिणामी या विषयाबाबत जागरूकता वाढणार आहे. कर्जरोख्याचा विषय सोप्या भाषेत वाचकांसमोर येणार आहे तसेच विविध प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत.

**※ पुस्तक म्हणजे गुंतवणुकीचा पाया –**

ज्येष्ठ सल्लागार फाटक यांनी सांगितले, की हे पुस्तक म्हणजे सगळ्या गुंतवणुकीचा पाया आहे. कोणतीही जोखीम नसणारा कर्जरोखा म्हणजे सरकारी कर्जरोखा होय. तो सुरक्षिततेचा मानदंड आहे. म्हणजे कोणतीही जोखीम नसणारा कर्जरोखा आहे. गुंतवणूकदार यांना अभ्यासासाठी पुस्तकाचा अमूल्य ठेवा आहे.

प्रास्ताविकात लेखक काकतकर यांनी पुस्तक लेखनामागची भूमिका मांडली. ते म्हणाले, बँकेच्या सेवेत असताना सुमारे २५ वर्षे गुंतवणूक क्षेत्रात काम केले त्याचा अनुभव मिळाला. तो



पुस्तकाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बँका, पतसंस्था, गुंतवणूकदार यांच्यासाठी पुस्तक उपयुक्त आहे. देशात सुमारे सहा लाख गुंतवणूकदार असून नजीकच्या काळात त्यांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. पुस्तक निर्मितीसाठी 'सहकार भारती'चे मोलाचे सहकार्य मिळाले, असे ते म्हणाले.

संपादक कुलकर्णी यांनी स्वागत करून सांगितले, की स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापनेला ५ वर्ष पूर्ण होत असल्याने देशभर सहकार सप्ताह साजरा करण्यात येत आहे. 'सहकार सुगंध'च्या वतीने प्रकाशित करण्यात येणारे हे २५ वे पुस्तक आहे. आजवर सहकार क्षेत्राविषयी विविध स्वरूपाची पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. तसेच सहकाराचा इतिहास सांगणारा आणि सहकारातील नेते, कार्यकर्ते यांच्या कार्याची सविस्तर माहिती देणारा 'सहकार महर्षि' ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे. त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

या वेळी सहकार भारतीच्या आजवरच्या वाटचालीची माहिती सांगितली. देशाच्या विविध राज्यांत सहकार भारतीचा विस्तार झाला आहे. तसेच कार्यक्रमाच्या अखेरीस आभार मानले. वर्षा कुलकर्णी – दाणी यांनी सूत्रसंचालन केले. पुस्तकाची मांडणी आणि सजावट आर्टिस्ट प्रथमेश जोशी यांनी केली आहे.

सुरुवातीला भारतमाता प्रतिमा पूजन करण्यात आले. नागरी सहकारी बँक आदर्श उपविधी समिती अध्यक्षपदी सहकार विभागाचे माजी अतिरिक्त आयुक्त दिनेश औउळकर, कॉसमॉस सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झालेले सचिन आपटे, उपाध्यक्ष यशवंत कासार आणि व्यवस्थापन मंडळ अध्यक्षपदी निवड झालेले संजीव खडके तसेच पुस्तकाचे सहयोगी लेखक आशिष कुवळेकर आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या उपाध्यक्षपदी निवडून आलेले दैनिक पुढारीचे वरिष्ठ पत्रकार किशोर बरकाले यांचा सन्मान करण्यात आला.

या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमासाठी राज्याच्या विविध भागांत सहकार क्षेत्रात कार्यरत असणारे पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१२० वर्षांची परंपरा असलेल्या कॉसमॉस को–ऑप. बँकेच्या अत्याधुनिक अशा सहकार सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन आपटे, उपाध्यक्ष सीए यशवंत कासार आणि व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष संजीव खडके यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कॉसमॉस बँक नेहमीच सहकार भारती आणि सहकार सुगंधच्या उपक्रमांना भरघोस पाठिंबा देत असते.**



किशोर बरकाले



सचिन आपटे



यशवंत कासार



संजीव खडके



आशिष कुवळेकर




सहकार महर्षी पुरस्कार मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते स्वीकारताना विद्याधर अनास्कर. उजवीकडे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व उद्योगमंत्री उदय सामंत

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांना 'सहकार महर्षी', ॲड. दीपक पटवर्धन यांना 'सहकार गौरव पुरस्कार' प्रदान

**मुंबई** – सहकार हे ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम असून सहकार चळवळीने शेतकऱ्यांना बळ दिले आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या सहकार धोरणामुळे एकूणच सहकार क्षेत्राला बळ मिळाले आहे, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.



ॲड. दीपक पटवर्धन




सीए रेवती पैठणकर

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व सहकारी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'सहकार गौरव पुरस्कार-२०२६' या समारंभात 'सहकार महर्षी' म्हणून राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर तर राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांना 'सहकार गौरव पुरस्कार-२०२६' राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते

प्रमुख अतिथी म्हणून विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उद्योगमंत्री व रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण व आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी केले होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पहिली सहकारी पतपेढी सन १९०४ मध्ये सुरू झाली. तर सन १९११ मध्ये शिखर बँक स्थापन करण्यात आली. सहकाराचा विचार समाजात रुजविण्यात धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता यांनी सहकाराला दिशा दिली, असे ते म्हणाले.

**※ राज्य सहकारी संघाचा निधी सुरू करणार –**

राज्य सहकारी संघाच्या निधीबाबत बोलताना त्यांनी सांगितले, की राज्य सहकारी संघाला मोठी परंपरा आहे आणि सहकार क्षेत्राला दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी सहकार क्षेत्रात प्रशिक्षित कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत, म्हणून बंद असणारा निधी नव्याने सुरू करण्यात येणार आहे, असे त्यांनी जाहीर केले.

यामध्ये 'सहकार महर्षी' म्हणून विद्याधर अनास्कर, 'सहकार रत्न' म्हणून भगिनी निवेदिता बँकेच्या अध्यक्षा सीए रेवती पैठणकर, 'सहकार भूषण' म्हणून आमदार विनय कोरे व 'सहकार गौरव' म्हणून ॲड. दीपक पटवर्धन यांचा सन्मान करण्यात आला. सहकार चळवळीच्या विकासासाठी दिलेले मोलाचे योगदान, प्रभावी नेतृत्व, समर्पित कार्य आणि सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत पुरस्कार निवड समितीने ॲड. पटवर्धन यांची पुरस्कारासाठी निवड केली होती सहकारामध्ये उत्तम काम करणारे ॲड. पटवर्धन हे माझ्या मतदार संघातील असल्याचा सार्थ अभिमान आहे, असे उद्योग मंत्री सामंत यांनी सांगितले.

सहकारामध्ये उत्तम काम करणाऱ्या व्यक्तींचा हा गौरव असून त्यांच्या चांगल्या व उत्तम कामाला शासनाचा नेहमी पाठिंबा राहील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

**※ या वेळी सहकार क्षेत्रातील अन्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. ते याप्रमाणे – सहकार गौरव पुरस्कार प्राप्त विजेते –**

**※ महिला सहकार शक्ती पुरस्कार** – दि अण्णासाहेब सावंत नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा शोभा सावंत

**※ सहकार विभूषण पुरस्कार** – शिवाजीराव नलावडे, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

**※ सहकार प्रेरणा पुरस्कार आणि कार्यालयीन कामकाजासाठीचे विशेष प्रशस्तिपत्र :** विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील आणि जिल्हा उपनिबंधक राजेश लव्हेकर

**※ सहकार नवोन्मेष पुरस्कार –** मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सिद्धार्थ कांबळे, मुंबई हाउसिंग फेडरेशनचे प्रकाश दरेकर आणि चारकोप अभिलाषा गृहनिर्माण सहकारी सोसायटीचे श्रीकांत कवठणकर

**※ सहकार ग्रामविकास पुरस्कार –** डॉ. नामदेव उसेंडी, गडचिरोली

**पान नं. १७ वर...**




# राजकारण विरहित सहकार अपेक्षित - राज्य सहकारी बँक प्रशासक अनास्कर

## सहकार सप्ताहाचे उत्साहात उद्घाटन

**भारत सरकारतर्फे ६ जुलै २०२१ रोजी स्वतंत्र केंद्रीय सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. मंत्रालयाच्या स्थापनेला यंदा म्हणजे २०२६ मध्ये पाच वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, यांच्यातर्फे २९ जून २०२६ ते ६ जुलै २०२६ या कालावधीत सहकार सप्ताह साजरा करण्यात आला. सप्ताहानिमित्त पुणे, मुंबई आणि सांगली येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.**

**पुणे –** सहकाराचे अनेक पैलू आहेत. सहकारी गृहसंस्था आणि अपार्टमेंट हा मोठा भाग असून गृहसंस्थांच्या पातळीवर सहकाराची तत्त्वे रुजवणे आवश्यक आहे. तसेच राजकारण विरहित सहकार अपेक्षित आहे, असे राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

भारत सरकारतर्फे ६ जुलै २०२१ रोजी स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय सहकार मंत्रालयाला यंदा म्हणजे २०२६ मध्ये पाच वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्त सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, यांच्यातर्फे २९ जून २०२६ ते ६ जुलै २०२६ या कालावधीत सहकार सप्ताह साजरा करण्यात येत आहे. सप्ताहाचे उद्घाटन राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सनदी अधिकारी (आयएएस) हरनाम सिंग होते. यावेळी व्यासपीठावर सहकार आयुक्त दीपक तावरे, यशदाचे महासंचालक सुहास दिवसे, महाराष्ट्र हौसिंग अँड अपार्टमेंट फेडरेशनचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष कर्णिक होते.

**✻ राजकारणविरहित सहकार अपेक्षित –**

अनास्कर म्हणाले, की सहकार आणि राजकारण यांचे नाते अतुट असले, तरीही राजकारणविरहित सहकार अपेक्षित आहे. राजकीय नेतृत्वाने सहकाराभोवतीचे कुंपण या भूमिकेतून काम करावे. तरी देखील सहकार आणि राजकारण यामध्ये लक्ष्मणरेषा असणे आवश्यक आहे. शालेय स्तरापासूनच सहकाराची बीजे रुजविणे अपेक्षित असताना शालेय अभ्यासक्रमातून सहकार नामशेष होत आहे, हे वास्तव खेदजनक आहे.

पूर्वी शाळा-शाळांमध्ये सहकार भांडार स्थापन करून त्याचे नियोजन विद्यार्थ्यांद्वारे केले जात होते. त्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकाराची तत्त्वे त्यांच्यापर्यंत पाझरत होती. सहकाराची ही तत्त्वे विद्याथिदशेत अधोरेखित व्हावी म्हणून पुढाकार घेऊन तीन धडे तयार करून दिले. मात्र, गेल्या २० वर्षांत त्याचा समावेश अभ्यासक्रमात झालेला नाही, सहकार जगणे, वाढणे आणि टिकणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले

**✻ सहकाराचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट –** आयुक्त तावरे म्हणाले, की ६ जुलै २०२१ रोजी सहकार मंत्रालयाची स्थापना झाली. सहकार चळवळीला गती आणि नवीन दिशा प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने गेल्या पाच वर्षांत अनेक क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले. सहकार विभागातील बदलामुळे या क्षेत्राची निकोप आणि सुदृढपणे वाढ होत आहे. सहकाराचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट साध्य होत आहे. फेडरेशनचे अध्यक्ष पटवर्धन यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन सुनील जोशी यांनी केले. सहकार सप्ताहाच्या प्रारंभी सहकार झेंडावंदन करण्यात आले. हरित उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करून सहकार दिंडी काढण्यात आली.

## सहकार सप्ताह समारोप



**पुणे –** सहकार मंत्रालयामुळे सहकारांतर्गत येणाऱ्या विविध विभागांमध्ये सुसूत्रता आली आहे. त्यामुळे अधिकाधिक नागरिकाभिमुख निर्णय घेतले जात आहेत, असे मत महाराष्ट्र हौसिंग अँड अपार्टमेंट फेडरेशनचे अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी व्यक्त केले. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्यातर्फे सहकार सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहाचा समारोप येथे झाला, त्यावेळी पटवर्धन बोलत होते.

सहकार विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. पटवर्धन म्हणाले की, सहकाराअंतर्गत येणाऱ्या केवळ गृहनिर्माण संस्थांचा विचार केला तरी त्यात अफाट काम आहे. सहकार मंत्रालयाच्या स्थापनेमुळे जटील नियम कालबाह्य करण्यात आले असून नियमांत लवचिकता आणली आहे. गृहनिर्माणाशी संबंधित अनेक अधिकार सभासद आणि समिती सदस्यांना देण्यात आले आहेत. प्रशिक्षणाचे अनेक कार्यक्रम राबविण्यात येत असून गृहनिर्माण संस्थांशी संबंधित सभासदांना थेट लाभ मिळेल, अशी त्यांची रचना करण्यात आली आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दृक्श्राव्य पद्धतीने उपस्थितांशी संवाद साधला. श्यामला देसाई, निवृत्त जनरल विजय पवार, चैतन्य पुरंदरे सुहास ढवळे, अजित चौघुले, सुभाष कर्णिक, संजय सूर्यवंशी, सुप्रिया पटवर्धन-फडके आदींनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन समीर रूपदे तर मनीषा कोष्टी यांनी आभार मानले.

# आंतरराष्ट्रीय सहकारी दिनाच्या निमित्ताने...

आंतरराष्ट्रीय सहकारी दिन हा जगभरातील सहकारी चळवळीचे महत्त्व अधोरेखित करणारा एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. समाजातील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये सहकार क्षेत्राचे योगदान मोठे असून, एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक हा सहकाराचा मूलमंत्र आहे. सहकार्य, लोकशाही, समानता आणि सामाजिक न्याय या मूल्यांच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी हा दिवस साजरा केला जातो.



**शरद जाधव**

**❊ आंतरराष्ट्रीय सहकारी दिनाचा प्रारंभ** – आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सन १९२३ पासून आंतरराष्ट्रीय सहकारी दिन साजरा करण्यास सुरुवात केली. जगभरातील सहकारी संस्थांचे कार्य, त्यांचे सामाजिक आणि आर्थिक योगदान याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, हा त्यामागील मुख्य उद्देश होता.

सन १९९५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने या दिवसाला अधिकृत मान्यता दिली, तेव्हापासून 'दरवर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी' हा दिवस जगभरात साजरा केला जातो.

**❊ सहकार चळवळीचा मूलभूत विचार** – सहकार म्हणजे परस्पर सहकार्य, विश्वास, समान सहभाग आणि सामूहिक प्रगती यांचा संगम होय. समाजातील लोकांनी एकत्र येऊन आपले आर्थिक, सामाजिक आणि व्यावसायिक प्रश्न सोडविण्यासाठी लोकशाही पद्धतीने स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.

**❊ सहकाराची प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे** – १. स्वेच्छेने आणि खुले सदस्यत्व, २. सदस्यांचे लोकशाही नियंत्रण ३. सदस्यांचा आर्थिक सहभाग ४. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य ५. शिक्षण प्रशिक्षण आणि माहितीचा प्रसार ६. सहकारी संस्थांमधील परस्पर सहकार्य ७. समाजाच्या विकासासाठी बांधिलकी

**❊ आंतरराष्ट्रीय सहकारी दिनाचे महत्त्व म्हणजे** – आर्थिक विकासाला चालना मिळते. ग्रामीण विकासाला गती मिळते. रोजगार निर्मिती होते. सामाजिक समता निर्माण होते. लोकशाही मूल्ये बळकट होतात. महिलांचे सक्षमीकरण होते. शाश्वत विकासाला प्रोत्साहन मिळते. समाजामध्ये बंधुभाव, विश्वास आणि सामूहिक जबाबदारीची भावना वाढीस लागते.

**दि. ४ जुलै हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय सहकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने सहकार भारतीचे संघटन प्रमुख शरद जाधव यांनी एकूणच सहकार क्षेत्राचा सविस्तर आढावा या लेखाच्या माध्यमातून घेतला आहे.**

**❊ आंतरराष्ट्रीय सहकारी दिन कसा साजरा करावा?**

सहकार विषयक व्याख्याने आणि परिसंवाद आयोजित करावेत. यशस्वी सहकारी संस्थांचा गौरव करावा. निबंध, वक्तृत्व आणि प्रश्नमंजूषा स्पर्धांचे आयोजन करावे. वृक्षारोपण, रक्तदान आणि स्वच्छता अभियान राबवावे. सहकार विषयक प्रदर्शन भरवावे. डिजिटल माध्यमातून जनजागृती करावी. सभासद आणि नागरिकांशी संवाद कार्यक्रम आयोजित करावेत.

**❊ भारतातील सहकार क्षेत्राचे योगदान** – भारतातील सहकार चळवळ ही जगातील सर्वात मोठ्या आणि प्रभावी सहकार चळवळींपैकी एक मानली जाते. देशातील लाखो शेतकरी, कामगार, महिला, कारागीर आणि लघुउद्योजक यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये सहकारी संस्थांचे अमूल्य योगदान आहे.

भारतीय 'कृषी अर्थव्यवस्थेचा कणा' असलेल्या शेतकऱ्यांना कर्ज, बियाणे, खते, सिंचन सुविधा, उत्पादन प्रक्रिया आणि विपणन यांसाठी सहकारी संस्थांनी मोठा आधार दिला आहे. प्राथमिक कृषी पतसंस्था आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांनी ग्रामीण भागात वित्तीय सेवा पोहोचवून शेतकऱ्यांना सावकारी व्यवस्थेपासून मुक्त करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. दुग्ध व्यवसायामध्ये सहकारी चळवळीने अभूतपूर्व परिवर्तन घडवून आणले. दूध उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, योग्य दर मिळवून देणे आणि उत्पादन वाढीसाठी तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे यामध्ये दूध सहकारी संस्थांची महत्त्वाची भूमिका आहे. तसेच साखर उद्योगामध्ये सहकारी साखर कारखान्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना दिली. या उद्योगामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती झाली, पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आणि अनेक गावांचा सर्वांगीण विकास झाला. त्याचप्रमाणे गृहनिर्माण क्षेत्रामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांनी मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे कार्य केले आहे.

महिला बचत गट आणि महिला सहकारी संस्थांमुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन, स्वयंरोजगार आणि नेतृत्वाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. आज अनेक महिला उद्योग, प्रक्रिया उद्योग, हस्तकला आणि सेवा क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत. मच्छीमार, हातमाग कामगार, फळ-भाजीपाला उत्पादक, आदिवासी आणि दुर्गम भागातील उत्पादक यांनाही सहकारी संस्थांनी संघटित करून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. सहकारी बँका आणि नागरी पतसंस्था यांनी लघुउद्योजक व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना वित्तीय मदत उपलब्ध करून देऊन आर्थिक विकासाला हातभार लावला आहे. आज भारतामध्ये लाखो सहकारी संस्था कार्यरत असून त्या देशाच्या आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकासामध्येही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

**❊ महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचे विशेष योगदान...** – महाराष्ट्र राज्य हे देशातील सहकार चळवळीचे अग्रणी राज्य म्हणून ओळखले जाते. ग्रामीण विकास, कृषी प्रगती, उद्योगनिर्मिती आणि सामाजिक परिवर्तनामध्ये महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राने ऐतिहासिक योगदान दिले आहे.

**❊ सहकारी साखर कारखाने...** महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने हे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ ठरले आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला हमी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, रोजगार निर्मिती करणे, रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण संस्था आणि आरोग्य सुविधा निर्माण करणे या क्षेत्रांत कारखान्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. साखर उद्योगाच्या माध्यमातून वाहतूक, दुरुस्ती, यंत्रसामग्री, खत निर्मिती आणि इतर पूरक उद्योगांनाही चालना मिळाली.

**❊ दूध संघ आणि दुग्ध व्यवसाय** – महाराष्ट्रातील जिल्हा आणि तालुकास्तरीय दूध संघांनी लाखो दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आहे. दूध संकलन, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विक्री यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांना नियमित उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला आहे. दुग्ध सहकारी संस्थांमुळे महिलांचा आर्थिक सहभाग वाढला असून अनेक महिला स्वयंसाहाय्यता गट आणि दुग्ध व्यवसायाशी जोडल्या गेल्या आहेत.

**❊ सहकारी पतसंस्था आणि सहकारी बँका** – ग्रामीण आणि शहरी भागातील सहकारी पतसंस्था आणि सहकारी बँकांनी लघुउद्योजक, व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले आहे. शिक्षण, व्यवसाय, शेती, घरबांधणी आणि लघुउद्योगांसाठी कर्जपुरवठा करून संस्थांनी आर्थिक विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. विशेषतः ग्रामीण भागात बँकिंग सेवा पोहोचविण्यामध्ये सहकारी क्षेत्राचे योगदान उल्लेखनीय आहे.

**❊ कृषी सहकारी संस्था...** – कृषी सहकारी संस्था आणि कृषी प्रक्रिया संस्था यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे आणि कृषी अवजारे उपलब्ध करून देण्यात येतात. याशिवाय शेतीमाल साठवणूक, प्रक्रिया, विक्री आणि निर्यात यामध्येही कृषी सहकारी संस्थांची भूमिका

**पुढील पानावर...**

मागील पानावरून...

# आंतरराष्ट्रीय सहकारी दिनाच्या निमित्ताने...

महत्त्वाची आहे. सामूहिक खरेदी आणि सामूहिक विक्रीमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन त्यांना अधिक लाभ मिळण्यास मदत होते.

※ **महिला बचत गट आणि स्वयंरोजगार** – महिला बचत गटांच्या माध्यमातून हजारो महिलांनी लघुउद्योग, प्रक्रिया उद्योग, शिवणकाम, अन्न प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय आणि विविध सेवा उद्योग सुरू केले आहेत. यामुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक विकासालाही चालना मिळाली आहे.

※ **ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तन** – सहकारी संस्थांनी केवळ आर्थिक विकासच नव्हे तर शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांमध्येही महत्त्वाचे योगदान दिले आहे. अनेक ग्रामीण भागांमध्ये शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे आणि आरोग्य सेवा उभारण्यात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे.

※ **मत्स्य व्यवसायातील सहकार चळवळ** – कोकण किनारपट्टीसह राज्यातील विविध भागांमध्ये मत्स्य व्यवसायाशी संबंधित सहकारी संस्थांनी मच्छीमार बांधवांच्या आर्थिक उन्नतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मासेमारीसाठी आवश्यक जाळी, बोटी इंधन, बर्फ निर्मिती, शीतगृह सुविधा आणि मत्स्य उत्पादनांच्या विक्रीसाठी सहकारी संस्थांनी प्रभावी व्यवस्था निर्माण केली आहे. सहकारी संस्थांमुळे मच्छीमारांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि योग्य दर मिळण्यास मदत झाली आहे. तसेच मत्स्य प्रक्रिया, साठवणूक आणि निर्यात क्षेत्रालाही चालना मिळाली आहे.




※ **हातमाग, वस्त्रोद्योग आणि कारागीर सहकारी संस्था...** – हातमाग विणकर, कारागीर, लघुउद्योजक आणि पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या समाजघटकांना संघटित करून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात सहकारी संस्थांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. सामूहिक खरेदी उत्पादन आणि विक्री यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ झाली आहे.

※ **फळ-भाजीपाला आणि कृषी प्रक्रिया सहकारी संस्था** – फळे, भाजीपाला, धान्य, कडधान्ये आणि इतर कृषी उत्पादनांच्या प्रक्रिया, साठवणूक, पॅकेजिंग आणि विपणनामध्ये सहकारी संस्थांची भूमिका वाढत आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला अधिक मूल्य मिळवून देण्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योग महत्त्वाचे ठरत आहेत.

※ **ग्राहक सहकारी संस्था** – सर्वसामान्य नागरिकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू वाजवी दरात उपलब्ध करून देण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांनी मोठे योगदान दिले आहे. ग्राहकांचे हित जपणे आणि बाजारातील अनावश्यक नफेखोरीवर नियंत्रण ठेवणे हे या संस्थांचे प्रमुख उद्दिष्ट असते.

※ **गृहनिर्माण सहकारी संस्था** – शहरी आणि उपनगरी भागांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांनी लाखो कुटुंबांना परवडणारी घरे उपलब्ध करून दिली आहेत. सामूहिक सहभागातून घरबांधणीची संकल्पना यशस्वीपणे राबविण्यात आली आहे.

※ **वाहतूक आणि सेवा सहकारी संस्था** – वाहतूक, मालवाहतूक, प्रवासी सेवा श्रमिक संस्था आणि विविध सेवा व्यवसायांमध्येही सहकारी संस्थांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यामुळे अनेक युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

※ **आदिवासी आणि वनउत्पादन सहकारी संस्था** – आदिवासी भागांमध्ये वनउत्पादने, औषधी वनस्पती, मध, बांबू आणि इतर नैसर्गिक उत्पादनांच्या संकलन आणि विक्रीसाठी सहकारी संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यामुळे आदिवासी समाजाच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही केवळ आर्थिक चळवळ नसून सामाजिक परिवर्तनाची आणि ग्रामीण विकासाची प्रभावी चळवळ म्हणून ओळखली जाते.

※ **आजच्या काळात सहकाराची गरज** – आजच्या जागतिकीकरणाच्या, उदारीकरणाच्या आणि तीव्र स्पर्धेच्या युगात सहकाराची आवश्यकता पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. लहान शेतकरी, सूक्ष्म उद्योग कारागीर आणि ग्रामीण उत्पादक यांच्यासमोर बाजारपेठ, भांडवल, तंत्रज्ञान आणि विपणन यांसारखी अनेक आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत सहकार हे एक प्रभावी आणि शाश्वत माध्यम ठरते. शेती क्षेत्रामध्ये उत्पादन खर्च वाढत असून शेतीमालाच्या किमतींमध्ये चढ-उतार होत असतात अशा वेळी शेतकरी एकत्र येऊन खरेदी, उत्पादन प्रक्रिया साठवणूक आणि विक्री यांसाठी सहकारी पद्धतीचा अवलंब केल्यास खर्च कमी होतो आणि नफा वाढतो.

डिजिटल अर्थव्यवस्था आणि ई-कॉमर्सच्या युगात लहान उत्पादकांना मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करणे कठीण जाते. सहकारी संघटनांच्या माध्यमातून सामूहिक ब्रँडिंग, ऑनलाइन विपणन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बाजारपेठेपर्यंत पोहोचणे शक्य होते.

बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्यासाठी सहकारी उद्योग प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रातील सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. युवकांना स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार उपयुक्त ठरतो.

हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक अस्थिरता यांसारख्या संकटांच्या काळात सहकारी संस्था सदस्यांना आर्थिक आणि सामाजिक आधार देतात. सामूहिक प्रयत्नांमुळे संकटांचा सामना अधिक प्रभावीपणे करता येतो. महिलांचे सक्षमीकरण, ग्रामीण विकास, आर्थिक समावेशन आणि सामाजिक न्याय या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीही सहकार आवश्यक आहे. सहकारामुळे समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे शक्य होते. आजच्या काळात 'एकट्याची स्पर्धा' यापेक्षा 'सामूहिक प्रगती' हा विचार अधिक महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे सहकार ही केवळ आर्थिक संकल्पना नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे.

※ **सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने** – तंत्रज्ञानाचा अपुरा वापर. पारदर्शकतेचा अभाव. सदस्यांचा कमी सहभाग. आर्थिक व्यवस्थापनातील अडचणी. युवकांचा कमी सहभाग. वाढती स्पर्धा. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव. या आव्हानांवर मात करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक प्रशासन, कौशल्य विकास आणि युवकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

※ **सहकार दिनासाठी काही घोषवाक्ये** –

- सहकारातून समृद्धीकडे वाटचाल
- एकजुटीतून विकास, सहकारातून विश्वास
- सर्वांसाठी विकास, सहकाराचा प्रकाश
- सहकार हेच ग्रामीण विकासाचे प्रभावी साधन
- एकतेची शक्ती म्हणजे सहकार

आंतरराष्ट्रीय सहकारी दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून सहकार्य लोकशाही, समानता आणि सामाजिक बांधिलकी यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. सहकार ही ग्रामीण आणि शहरी विकासाला जोडणारी, आर्थिक प्रगतीला दिशा देणारी आणि समाजात समान संधी निर्माण करणारी प्रभावी व्यवस्था आहे. सहकारातून समृद्धी हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येक नागरिकाने, प्रत्येक संस्थेने आणि प्रत्येक पिढीने सहकाराची मूल्ये आत्मसात करून त्याचा प्रसार करण्यासाठी योगदान दिले पाहिजे. सामूहिक प्रयत्न, परस्पर विश्वास आणि लोकशाही सहभाग यांच्या बळावरच सक्षम, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारताची निर्मिती शक्य आहे.

**– शरद जाधव, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश संघटनप्रमुख**
**मो. नं. – ९४२२७६१६९९** ※※※※

# सहकार भारती सोलापूर आयोजित 'नवीन सहकार धोरण' परिषद यशस्वी



**सोलापूर** – सहकार भारती सोलापूरतर्फे आयोजित व्हिजन एक्स्पो उपक्रमाच्या स्मरणिकेचे प्रकाशन तसेच नवीन सहकार धोरण यावर व्याख्यानाचा कार्यक्रम झाला.

सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे महामंत्री व सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य तसेच सहकार कायदा उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे, सहकार भारती प्रदेश अध्यक्ष व अपना सहकारी बँकेचे अध्यक्ष दत्ताराम चाळके, सोलापूर सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, सहकार भारती व्हिजन एक्स्पो स्वागत समिती अध्यक्षा सुधा अळलीमोरे उपस्थित होत्या.

दीप प्रज्वलनाने सुरुवात झाली. पाहुण्यांची ओळख व व्हिजन एक्स्पोच्या निमित्ताने कार्यक्रमाचा आढावा तसेच स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले. जुगादे यांचे 'सहकार धोरण' यावर व्याख्यान झाले.

जिल्हा सहकार भारती अध्यक्ष किरण करकमकर, मंत्री यशवंत बुऱ्हाडे महिला प्रमुख प्राची धामणगावकर यांची मनोगते झाली. सहकार भारती प्रदेशाचे पदाधिकारी प्रवीण बुलाख प्रदेश सहसंघटक, श्रीकांत पटवर्धन प्रदेश कार्यालय प्रमुख, संतोष गायकवाड विभाग प्रमुख, नाना वाघमोडे विभाग सहप्रमुख डॉ. जयंत शेळगीकर प्रदेश कार्यकारणी सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन हनुमंत कोळी यांनी केले.

# सहकार चळवळ विकासाचे 'ग्रोथ इंजिन' – माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू

## सहकार पर्व- राज्यस्तरीय सहकार परिषदेचे उद्‌घाटन

**पुणे** – यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीने सहकार चळवळीला दिशा मिळाली आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' म्हणून सहकार चळवळ महत्त्वपूर्ण ठरली. आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकास साधणारी ही सहकार चळवळ येणाऱ्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेची ताकद असणार आहे. सनदी लेखापालांनी सहकाराला अधिक सक्षम करण्यासाठी आर्थिक व्यवस्थापनाची जोड देण्यात योगदान द्यावे, असे माजी केंद्रीय मंत्री सीए सुरेश प्रभू यांनी सांगितले.

दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (डब्ल्यूआयआरसी), आयसीएआय पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सातारा, सांगली, इचलकरंजी व लातूर या शाखांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'सहकार पर्व- राज्यस्तरीय सहकार परिषदेचे उद्धाटन झाले. त्यावेळी प्रभू दूरभाष प्रणालीद्वारे (व्हर्च्युअल) बोलत होते. दोन दिवसांच्या या सहकार परिषदेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.



'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए अभिषेक धामणे, सीए राजेश अग्रवाल, सीए डॉ. यशवंत कासार, आयसीएआय पुणे शाखेचे अध्यक्ष सीए प्रणव आपटे, उपाध्यक्ष सीए नीलेश येवलेकर, सचिव सीए नेहा फडके व्यासपीठावर होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आपल्याकडे सहकार क्षेत्र आस्तित्त्वात आहे, असे नमूद करून ते म्हणाले, यशवंतरावांसह वसंतदादा पाटील, इतर सर्वच नेत्यांनी सहकाराला उभारी दिली. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. सामाजिक परिवर्तनाचे माध्यम असलेल्या सहकाराने राजकरण, समाजकारण, अर्थकारण सर्वच गोष्टींना वेगळी दिशा दिली आहे. सहकाराचे महत्त्व ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली. त्यामुळे देशभरात सहकार क्षेत्राचा विस्तार होत असून, साखर कारखाने, कृषीपूरक व्यवसाय, संस्था, दूध डेअरी, सहकारी बँक पतसंस्था अशा विविध सहकारविषयक गोष्टींचा व्यापक विस्तार होत आहे. भविष्यात सहकार क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देणार आहे. सीएना या क्षेत्रातही मोठ्या संधी उपलब्ध आहेत असे ते म्हणाले.

सीए चंद्रशेखर चितळे म्हणाले, शेतीप्रधान अर्थव्यवस्थेला सक्षम करण्यात सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. सहकाराचे महत्त्व देशभर वाढले असून, सहकारातून समृद्धीकडे या ध्येयाने सरकार काम करीत आहे. या चळवळीला व्यापक रूप यावे, व्यवस्थापन नीट होऊन, भागधारकांना लाभ व्हावा, अर्थव्यवस्थेला उभारी मिळावी, सहकारावर अवलंबून सर्व घटकांना विकासाची संधी मिळावी, यासाठी नव्याने आलेले सहकार धोरण उपयुक्त ठरेल. आर्थिक व्यवस्थापनात सनदी लेखापालांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सीए अभिषेक धामणे यांनी सहकाराचे महत्व अधोरेखित करीत या परिषदेच्या आयोजनामागील भूमिका मांडली. सीए प्रणव आपटे यांनी स्वागत प्रास्ताविक केले. सीए नेहा फडके यांनी सूत्रसंचालन तर सीए निलेश येवलेकर यांनी आभार मानले.

# सहकारी पतसंस्थांच्या अडचणी सोडविणार

**कोल्हापूर** – कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सहकारी पतसंस्थाना जाणवणाऱ्या विविध अडचणी सोडविण्यात येतील असे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी संगितले. जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सहकार मंत्री पाटील यांना देण्यात आले.

त्यावर त्यांनी आश्वासन दिले. तसेच विविध प्रश्नांबाबत चर्चा केली. फेडरेशन अध्यक्ष शंकर पाटील, कार्याध्यक्ष अनिल पाटील तसेच पदाधिकारी, अधिकारी यावेळी उपस्थित होते. गेल्या काही वर्षांमध्ये सहकारी पतसंस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

# सांगली अर्बन बँक कर्मचारी स्नेहसंवर्धन मेळावा उत्साहात साजरा



**सांगली –** सांगली अर्बन बँकेचा कर्मचारी स्नेहसंवर्धन मेळावा येथे उत्साहात करण्यात आला. बँकेच्या सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, मुंबई व मराठवाडा येथील शाखांमधील कर्मचारी मोठ्या संख्येने मेळाव्यात सहभागी झाले होते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ठेवी, कर्जे, शेअर्स, विमामध्ये व्यवसाय उद्दिष्टपूर्ती करणाऱ्या शाखा व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्याचा प्रारंभ दीपप्रज्वलन व बँक संस्थापक स्व.म.ह तथा अण्णा गोडबोले यांचे प्रतिमा पूजन करून झाला. मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष गणेश गाडगीळ आणि बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे यांनी मार्गदर्शन केले. व्यवस्थापन मंडळ सदस्य जयंत काकतकर यांनी बदलते बँकिंग यावर तसेच तज्ञ संचालक विश्वास चितळे यांनी 'सायबर सिक्युरिटी' यावर मार्गदर्शन केले.

अध्यक्ष सीए खिरे, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष गाडगीळ, उपाध्यक्ष संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक व संचालक मंडळ यांचे हस्ते उद्दिष्टपूर्ती केलेल्या शाखांना बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी तसेच वैयक्तिक उद्दिष्टपूर्ती केलेल्या कर्मचारी यांना प्रोत्साहन रक्कम प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. शाखा व्यवस्थापक व कर्मचारी यांनी मनोगत व्यक्त केले. संचालक संजय धामणगावकर यांनी समारोप केला.

संचालक सीए अनंत मानवी, एच. वाय. पाटील, संजय धामणगावकर, शैलेंद्र तेलंग, सागर घोंगडे, सतीश मालू, कालिदास हरिदास, रवींद्र भाकरे, अश्विनी आठवले, स्वाती करंदीकर, तज्ञ संचालक विश्वास चितळे, व्यवस्थापन मंडळ सदस्य जयंत काकतकर, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर उपस्थित होते. संदीप कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन व सुहास दिवेकर यांनी सहकार गीत सादर केले. संपूर्ण वंदे मातरमने समारोप झाला.

# पंचगंगा बँकेच्या ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेत १० टक्के लाभांशाची घोषणा

**कोल्हापूर –** येथील श्री पंचगंगा नागरी सहकारी बँकेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. बँकेचे अध्यक्ष सीए उमेश भोसले यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेत घेतला. ग्राहक व सभासद यांच्या सहकार्याने ४४० कोटी ठेवी व २६३ कोटी कर्जाचा आकडा गाठला असून ७०० कोटीचा मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केल्याचे त्यांनी सांगितले. यावर्षी बँकेला नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात व ऑडीट वर्ग 'अ' ठेवण्यात यश मिळाले आहे. ग्राहक व सभासदांसाठी १० टक्के लाभांशाची घोषणा केली. अहवाल काळात बँकेने कराड येथे बँकेची पाचवी शाखा सुरु केली असून तेथे ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. अहवाल वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक फडणीस यांनी केले. मागील सभेचे प्रोसीडिंग वाचन महाव्यवस्थापक सुशील कुलकर्णी यांनी केले. बँकेचे उपाध्यक्ष राजगोंडा पाटील यांनी आभार मानले.

सभासदांसाठी आर्थिक साक्षरता व सायबर सुरक्षाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने आयटी तज्ञ सुजित जोशी यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. बँकचे संचालक राजाराम शिपुगडे, डॉ. माधुरी कुलकर्णी, भालचंद्र साळोखे, उपेंद्र सांगवडेकर, विजय चव्हाण, केशव गोवेकर, ॲड. रामचंद्र टोपकर, भगवान काशीद, सुनील पेठे, राकेश कापशीकर, अंजली वालावलकर, सौरभ मुजुमदार, डॉ. मधुरा कुलकर्णी तसेच व्यवस्थापन मंडळ सदस्य दीपक सांगलीकर आदी उपस्थित होते.

राजन झुरळे, अमित साळुंखे, मकरंद वाळवेकर, संजय (बाबा) वाघापूरकर, डॉ. व्ही. एच. देशपांडे, अमोल कांदेकर शिवाजी पाटील, अंकुश वाघापूरकर, विजय सबनीस, शामराव खोत, इंद्रजीत साळोखे, सुरेंद्र कुलकर्णी, सभासदांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

पान नं. १२ वरून...

### बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर यांना सहकार महर्षी...

जिल्हा आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्था

* **सहकार बँकिंग उत्कृष्टता पुरस्कार** – सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाले. * **सहकार कृषिरत्न पुरस्कार** – संजय सुने (अमरावती), सचिन देशमुख-पारवेकर (यवतमाळ) आणि दिलीप पाटील (नंदुरबार)

* **दूध उत्पादक व सेवा सोसायटी पुरस्कार** – छत्रपती संभाजीनगर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष विजय काळे आणि लाडसावंगी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष गोकुळ राजपूत

* **सहकार समाजसेवा पुरस्कार** – सेकंडरी स्कूल एम्प्लॉइज को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील

* **सहकार नेतृत्त्व पुरस्कार** – महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणेचे अध्यक्ष अशोक जगताप. * **आदर्श सहकारी पतसंस्था पुरस्कार** – ज्ञानदीप सहकारी पतसंस्था व्ही. जी. पवार

* **सहकार उद्योग पुरस्कार** – गोराई मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष ऑल्डिन वसईकर. * **सहकार परिवर्तन पुरस्कार** – दि मुंबई अग्निशमन दल एम्प्लॉइज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष दशरथ घनवट.

* **युवा आणि ग्राहक सहकार पुरस्कार** – महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष रोहित निकम आणि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले.

# सहकार भारती राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पांचपोर यांची खामगाव अर्बनला भेट



**यवतमाळ** – सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पांचपोर यांनी नुकतीच खामगाव अर्बन को-ऑप. बँकेला सदिच्छा भेट दिली आणि बँकेच्या कामकाजाची माहिती घेतली. बँकेच्या यशस्वी वाटचालीबाबत समाधान व्यक्त केले. बँक अध्यक्ष प्रा. डॉ. विजय पुंडे आणि बँक मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव यांनी पांचपोर यांचे स्वागत केले. बँकेच्या विविध उपक्रमाची माहिती सांगितली. यावेळी सहकार भारतीचे विभाग प्रमुख नंदकिशोर काकोटे, जिल्हाध्यक्ष मीना देशमुख, जिल्हा महामंत्री प्रशांत वाणी जिल्हा महिला प्रमुख नितांजली जाणे, संघटनप्रमुख श्रीधर कराळे, सहसंघटन प्रमुख सुधाकर घाटे तसेच बँक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन राजू जुनारे यांनी केले.

# विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांचे सहकार भारतीच्या वतीने अभिनंदन

**यवतमाळ** – जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व सावकारांची संस्था येथे कार्यरत असलेले नानासाहेब चव्हाण यांची विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग, येथे पदोन्नती झाली. सहकार भारतीच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अमरावती विभाग प्रमुख अमित भिसे, जिल्हा महमंत्री राम साकळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अजय दंडे, अमोल बोदडे, लेखापाल भूषण मुळे उपस्थित होते.



# यवतमाळ जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा




**यवतमाळ** – आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताहानिमित्त जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व सावकारांची संस्था आणि वणी तालुका स्तरावर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यात वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, रुग्णसेवा, फळ वाटप, नेत्र तपासणी शिबिर, सहकार प्रशिक्षण शिबिर, सहकार क्रिकेट चषक यांचा समावेश होता.

सहाय्यक निबंधक रीता निनावे यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रम पांडे नागरी सह. पतसंस्था द्वारा संचालित ज्ञान साधना अभ्यासिका येथे सहकार क्षेत्रातील सहकारी परीक्षा व निवड प्रक्रियेची अभ्यासात्मक माहिती जिल्हा सहकार विकास अधिकारी दिनेश इखार आणि एन.एल.चंदन यांनी सांगितली. अनिल दंडे अध्यक्ष जनता नागरी सह पतसंस्था अध्यक्ष अनिल दंडे यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. रांगोळी स्पर्धा वंदना नखाते व वैदेही किनकर महिला प्रमुख व सह प्रमुख यांच्या संपर्कात पार पडला. मोफत नेत्र तपासणी शिबिर सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी व दैनिक/आवर्त ठेव प्रतिनिधी यांच्यासाठी आयोजित करण्यात आले.

सहकार सप्ताह निमित्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्थांद्वारा आयोजित 'सहकार क्रिकेट चषक' सामने आयोजित करण्यात आले होते. जनता नागरी सह. पतसंस्था, जाणता राजा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी, बाळासाहेब नागरी सह. पतसंस्था, चंद्रपुर अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी, चैतन्य अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी, राधेसुमन अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सह. पतसंस्था, माँ जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था, वटवृक्ष अर्बन नागरी सहकारी पतसंस्था तथा जिल्हा निबंधक व सहाय्यक निबंधक अधिकारी व कर्मचारी या सर्व संस्थांच्या क्रिकेट संघांनी सहभाग नोंदविला.

वणी तालुक्यातील सहाय्यक निबंधक सचिन कुंडमेथे यांच्या नेतृत्त्वाखाली वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, रुग्णसेवा (फळ वाटप), नेत्र तपासणी, निबंध स्पर्धा, विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. हा समारंभ सचिन कुडमेथे, शैलेश मडावी, कवडू नगराळे, ॲड. देवीदास काळे, चंद्रशेखर खोंड, संजय खाडे, टीकाराम कोंगरे, गजानन बेजंकीवार कर्मचारी व नागरिक यांच्या उपस्थित पार पडला.

# चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने शेतकऱ्यांना कर्जवाटप

**चंद्रपूर** – चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आजवर शेतकऱ्यांना ७८८ कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे तर येत्या ३० सप्टेंबरपर्यंत एक हजार कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती बँक अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, शासनाने बँकेला ८३५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट दिले आहे तर शेतकरी संख्या ६७ हजार ६६८ इतकी आहे. गतवर्षी बँकेने ८०९ कोटींचे कर्ज वाटप केले आहे.

खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी यांना कर्ज उपलब्ध झाले असल्याने शेतीची कामे वेळेवर पूर्ण होऊ शकणार आहेत, अशी माहिती त्यांनी सांगितली.

# राष्ट्रीय मागासवर्ग आयोग सदस्यपदी किरण महल्ले

**अमरावती** – राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या सदस्यपदी माजी महापौर किरण महल्ले यांची निवड झाल्याबद्दल सहकार भारतीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर विधळे, महामंत्री दामोदर पवार, शहराध्यक्ष सतीश क्षीरसागर अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# नागरी सहकारी बँकांच्या आदर्श उपविधींकरिता रिझर्व्ह बँकेचा पुढाकार

नुकतीच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील नागरी सहकारी बँकांसाठी 'आदर्श उपविधी'चा मसुदा तयार करण्यासाठी एका समितीचे गठन केले आहे. या संदर्भात काढलेल्या परिपत्रकात रिझर्व्ह बँकेने ही सूचना मा. गव्हर्नर साहेबांबरोबर झालेल्या सभेमध्ये नागरी सहकारी बँकींग क्षेत्राकडूनच आल्याचे नमूद करत, त्यांनी फक्त त्या सूचनेचे पालन केल्याचे दर्शविले आहे.

वास्तविक सहकार हा राज्याच्या अखत्यारीतील विषय असताना आणि सहकारातील विविध प्रकारच्या संस्थांसाठी आदर्श उपविधी तयार करण्याचे अधिकार राज्यांच्या सहकार कायद्यात फक्त आणि फक्त सहकार निबंधकांनाच दिलेले असताना रिझर्व्ह बँक हा अधिकार स्वतःकडे कसा घेऊ शकते? हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. महाराष्ट्र कायद्यातील कलम १४ मधील या संदर्भातील तरतूद ही अत्यंत स्पष्ट आहे.



विद्याधर अनास्कर
राज्य सहकारी बँक प्रशासक

वास्तविक सहकारी बँकांची नोंदणी ही महाराष्ट्र राज्य सहकार कायद्यातंर्गत राज्याच्या सहकार निबंधकांकडे होते. घटनेतील तरतुदींनुसार समान गरज, ध्येय व उद्दिष्टे असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करतात. आपली संस्था कशी चालवावी अथवा चालावी या संदर्भातील नियम ते उपविधीद्वारे निबंधकांकडे स्थापनेच्या वेळी सादर करतात. उपविधींमधील तरतुदी या सहकार कायदा व देशात आस्तित्त्वात असणाऱ्या कायद्यांच्या तरतुदींशी सुसंगत आहेत का? हे तपासण्याचे काम सहकार खात्याचे आहे. त्यानुसार मंजूर झालेल्या उपविधींमधील तरतुदींनुसार संस्थेचे कामकाज पाहण्याची जबाबदारी संस्थेच्या संचालक मंडळाची असते. या पार्श्वभूमीवर येथे उपविधींच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपाचा प्रश्न येतोच कोठे? अशा परिस्थितीत नागरी सहकारी बँकांकडे व्यावसायिकतेचा (Professionalism) अभाव आहे, असा सातत्याने घोष करणाऱ्या रिझर्व्ह बँकेने उचलले हे पाऊल म्हणजे नागरी सहकारी बँकांचे स्वरुप सहकारी न राहता कॉर्पोरेट सदृश होण्याची नांदी आहे, असे म्हणावे लागेल.

उपविधींमधील तरतुदींपेक्षा कायद्यातील तरतूदी या श्रेष्ठ असतात हा स्थापीत कायदा (Settled Law) असताना व्यापारी बँकांच्या तरतुदी नागरी सहकारी बँकांच्या उपविधींमध्ये समाविष्ट करण्याचा रिझर्व्ह बँकेचा अट्टाहास एकाच कारणासाठी असू शकतो, तो म्हणजे एकदा का या सर्व तरतुदींचा नागरी सहकारी बँकांनी स्वीकार केल्यास, त्या संदर्भातील सर्व कायदेशीर लढाया संपुष्टात येतात. स्वेच्छेने स्वीकारलेल्या तरतुदींनुसारच बँकांना आपले कामकाज करावे लागेल.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा नागरी सहकारी बँकांकडे बघण्याचा आजपर्यंतचा दृष्टिकोन पाहता, सहकारी बँकिंगचे मॉडेल आणि व्यापारी बँकींगचे मॉडेल यामध्ये फरक करण्यास रिझर्व्ह बँक तयार नाही. सहकारी असो अथवा व्यापारी बँका असो, सर्वांना बँकिंगबाबतचे निकष समान असावेत, हा रिझर्व्ह बँकेचा प्रथमपासून अट्टाहास. यासाठी रिझर्व्ह बँकेने यापूर्वी केलेले प्रयत्न आपणांस स्मरत असतीलच. मोठ्या सहकारी बँकांनी स्वतःचे रूपांतर स्मॉल फायनान्स बँकेमध्ये करावे आणि लहान अशक्त बँकांनी, विलीनीकरण अथवा एकत्रीकरणाच्या रुपाने स्वतःचे अस्तित्त्व नष्ट करण्याच्या दृष्टीने यापूर्वी रिझर्व्ह बँकेने आखलेली अनेक धोरणे आपणांस ज्ञात आहेतच. तसेच लहान व आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या बँकांनी स्वतःचे रूपांतर पतसंस्थेमध्ये करावे असा सल्लाही रिझर्व्ह बँकेने या बँकांना दिल्याचे आपणांस स्मरत असेल. थोडक्यात व्यापारी बँकांचे मॉडेल हेच खरे यशस्वी बँकिंगचे मॉडेल होय, या निष्कर्षाप्रत येऊन पोहचलेल्या रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांच्या आदर्श उपविधीसंदर्भात उचलेले पाऊल म्हणजे नागरी सहकारी बँकांचे स्वरूप कॉर्पोरेट सदस्य होण्याची नांदी तर नाही ना? अशी शंका होण्यास भरपूर वाव आहे.

नागरी सहकारी बँकांचे स्वरुप कॉर्पोरेट सदृश होणार असे वाटण्याचे मुख्य कारण म्हणजे या समितीला दिलेली कार्यकक्षा होय. रिझर्व्ह बँक पत्रामध्ये म्हणते, सन २०२० मध्ये बँकींग नियमन कायद्यात (BR Act) झालेल्या सुधारणांनंतर नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात उत्तम प्रशासन (Good Government) नियामक अनुपालन (Compliance) आणि भांडवल उभारणीस प्रोत्साहन देण्यासाठी नवीन आदर्श उपविधी तयार करण्याची गरज आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या पत्रातच उपविधी तयार करताना कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यावयाचे ते सुचविले आहे.

राज्याचा सहकार कायदा हा संपूर्णत: सभासदांभोवती फिरतो, त्यामध्ये ठेवीदारांचा उल्लेख कोठेही नाही. किंबहुना 'सभासदांचे हित' हा सहकार कायद्याचा गाभा आहे. त्याउलट बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट हा ठेवीदारांभोवती फिरतो, त्यामध्ये सभासदांचा उल्लेख कोठेही नाही. किंबहुना ठेवीदारांचे हित हाच बँकिंग कायद्याचा गाभा आहे. अशा दोन विभिन्न उद्देश असलेल्या कायद्यांच्या तरतुदींचा आवश्यक तेवढा समावेश या आदर्श उपविधींमध्ये करताना, या दोन्ही कायद्यातील मुलभूत तत्त्वांना बळकट करण्याचे अवघड कामगिरी या तज्ज्ञ समितीपुढे आहे, असे वाटते.

तटस्थपणे रिझर्व्ह बँकेच्या पुढाकाराने होणाऱ्या या आदर्श उपविधींमधील संभाव्य तरतुदींचा विचार केल्यास काही व्यावसायिक फायदे या क्षेत्राला मिळतील.

**१) चांगले सुशासन** (Good Governance) –

संचालक मंडळ, बोर्ड ऑफ मॅनेजमेट, उपसमित्या आणि व्यवस्थापन यांच्या भूमिका स्पष्ट होतील. निर्णय प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येईल. संचालकांच्या १० वर्षांच्या कालावधींचा समावेश उपविधींमध्ये करण्याचा अट्टाहास रिझर्व्ह बँक करणार, कारण एकदा का तुम्ही ती तरतूद उपविधींद्वारे स्वीकारतील तर त्या संदर्भातील सर्व कायदेशीर मुद्देच संपुष्टात येतील.

**२) नियामक अनुपालन सुलभ होईल –**

रिझर्व्ह बँक आणि राज्याच्या सहकार कायद्याशी सुसंगत असे उपविधी तयार होतील. निरीक्षण आणि लेखापरीक्षणातील त्रुटी कमी होतील. परंतु यामध्ये रिझर्व्ह बँकेचेच वर्चस्व राहील. या उपविधींमध्ये 'रिझर्व्ह बँकेचे अधिकार' या शिर्षकाखाली आपल्या संचालक मंडळातील सदस्याला काढून टाकण्याचे, तसेच त्यांच्या जागी घेणाऱ्या संचालकांच्या नेमणुकीस रिझर्व्ह बँकेची पूर्व संमती घेण्याचे अथवा आपल्या संचालक मंडळामध्ये रिझर्व्ह बँकेचा प्रतिनिधी अथवा निरीक्षक नेमण्याचे अधिकारही आपणांस उपविधीद्वारे रिझर्व्ह बँकेस द्यावे लागतील.

**३) सर्व नागरी सहकारी बँकांसाठी समान चौकट –**

रिझर्व्ह बँकेचे आदर्श उपविधी स्वीकारल्याशिवाय आपल्याला रिझर्व्ह बँकेकडून व्यवसायासाठी कोणतीच नवीन परवानगी मिळणार नसल्याने सर्वांनाच हे आदर्श उपविधी स्वीकारावेच लागतील. त्यामुळे देशभरातील सहकारी बँकांमध्ये नियमांची एकरूपता येईल व नियमकांना या बँकांवर देखरेख करणे सोपे जाईल.

**४) भांडवल उभारणीस मदत होईल –**

बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्टमधील तरतूदींनुसार शेअर्स, फ्रेफरन्शीअल शेअर्स,

**पुढील पानावर...**

# सहकार आणि लोकशाही एकमेकांना पूरक तत्त्वे - आमदार रोहित पवार



**पुणे –** सर्वांना सोबत घेऊनच सर्वांगीण विकास होऊ शकतो, या लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वावरच सहकार चळवळ उभी असून सहकार आणि लोकशाही एकमेकांना पूरक असलेली तत्त्वे आहेत, असे मत आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले.

दि. ६ जुलै २०२१ रोजी स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय सहकार मंत्रालयाला यंदा म्हणजे २०२६ मध्ये पाच वर्ष पूर्ण होत आली आहेत. यानिमित्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, यांच्यातर्फे सहकार सप्ताह साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ यांच्या वतीने युवा सहकार संस्थेचा शुभारंभ आमदार रोहित पवार यांच्या हस्ते करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ अध्यक्ष सुहास पटवर्धन, बीएमसीसी महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप पौडेल, युवा सहाकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक भीम बलकवडे राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ उपाध्यक्ष सुभाष कर्णिक, सचिव मनीषा कोष्टी, राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ तज्ज्ञ संचालक प्रसाद परब, कोषाध्यक्ष चारुहास कुलकर्णी, अरुण निम्हण, प्रदेश युवा काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे आणि सचिन इटकर आदी उपस्थित होते.

आमदार पवार म्हणाले, की सहकाराच्या वृद्धीसाठी तंत्रज्ञानाचा कसा उपयोग करून घेता येईल आणि तरुणांच्या नवकल्पांचे स्वागत आणि समावेश कसा करता येईल, याचा धांडोळा घेतला पाहिजे. शेअरिंग इकोनॉमी ही संज्ञा अलीकडेच अस्तित्वात आली आहे. मात्र सहकार क्षेत्राच्या माध्यमातून शंभर वर्षांपूर्वी हे तत्त्व अस्तित्वात आले होते. शहरी आणि ग्रामीण भागावर थेट परिणाम घडवून आणणारी राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ ही एकमेव संस्था असून तिची व्याप्ती बरीच मोठी आहे.

युवा सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक बलकवडे, प्राचार्य दिलीप पौडेल, प्रसाद परब आणि सचिन ईटकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी केले. कोषाध्यक्ष चारुहास कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

---

**मागील पानावरून...**

## नागरी सहकारी बँकांच्या आदर्श उपविधींकरिता रिझर्व्ह बँकेचा पुढाकार

डिबेंचर्स या मार्गाने भांडवल उभारणीची प्रक्रिया सुलभ होऊ शकेल. मात्र हे करत असतानाच ‘एक सभासद एक मत’ हे सहकारातील परमोच्च तत्त्व पाळावे लागेल. तसेच या शेअर्सच्या खरेदी-विक्री व मूल्यांकनासाठी ‘सेबी’सारखी स्वतंत्र यंत्रणा सहकार तत्त्वांवर उभी करावी लागेल.

**५) व्यावसायिक व्यवस्थापनाला चालना मिळेल –**

तज्ज्ञ संचालक, युवा संचालक, समित्या व कौशल्याधारीत प्रशासनाला प्रोत्साहन मिळेल. जोखीम व्यवस्थापन अधिक सक्षम होईल. सहकारातील जरुरी पुरता नफा हे तत्त्व मागे पडून जास्तीत-जास्त नफा हे व्यापारी तत्व अंगीकारले जाईल.

**६) ठेवीदारांचा विश्वास वाढेल –**

रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण अधिक मजबूत झाल्यास ठेवीदारांमध्ये अधिक सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. ठेवीदारांचे प्रतिनिधी संचालक मंडळावर येतील. निवडणूक प्रक्रियेत कर्जदार सभासदांबरोबरच ठेवीदार सभासदांनाही प्राधान्य मिळेल.

**वरील फायद्यांबरोबरच पुढील तोटयांकडेसुद्धा दुर्लक्ष करून चालणार नाही.**

**१) सहकार तत्त्वांवर परिणाम होण्याची भीती –**

रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणामुळे सभासदांनी, सभासदांसाठी चालविलेली संस्था ही सहकारी संस्थांची ओळख पुसली जाऊन रिझर्व्ह बँकेने चालविलेली संस्था अशी ओळख निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक सभासदांचे नियंत्रण कमी होईल. सहकारी बँकांचे स्वरुप सहकारीपेक्षा कॉर्पोरेट सदृश होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**२) राज्याच्या सहकार कायद्याशी विसंगत तरतूदी येतील –**

राज्याचा सहकार कायदा आणि केंद्राचा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट या दोन वेगवेगळ्या कायद्यांच्या उद्देश व त्याअनुषंगाने असलेल्या तरतुदी भिन्न असल्याने अंमलबजावणीत अडचणी येऊ शकतात. यामुळे यानंतर राज्याला सहकार कायद्यात सहकारी बँकिंगसंदर्भात कायद्यात वेगळ्या प्रकरणाचा समावेश करावा लागल्यास आश्चर्य वाटायला नको.



**३) लहान नागरी सहकारी बँकांवर अतिरिक्त ताण येईल –**

नवीन नियम, समित्या, अनुपालन खर्च इ. लहान बँकांसाठी आर्थिकदृष्ट्या जड ठरू शकेल.

**४) अनुभवी नेतृत्त्वाला धक्का –**

संचालकांचे पात्रता निकष, त्यांचा कालावधी या पार्श्वभूमीवर अनुभवी संचालकांना कमी संधी मिळू शकेल. नवीन संचालकांना अनुभवाअभावी प्रभावी काम करता न आल्यास बँकेवरील ग्राहकांच्या विश्वासाला तडा जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**५) संक्रमण कालावधीतील अडचणी –**

हे आदर्श उपविधी असल्याने ते स्वीकारायचे अथवा नाही अथवा त्यापैकी कोणत्या तरतूदी स्वीकारायच्या यासंबंधी निर्णय बँकांच्या सभासदांनी घ्यावयाचा असला तरी रिझर्व्ह बँकेच्या रेट्यापुढे ते त्यांना स्वीकारावेच लागतील, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. यामुळे विद्यमान उपविधी बदलणे, वार्षिक सभेची मंजुरी घेणे आणि नोंदणी प्रक्रिया वेळखाऊ ठरू शकते. रिझर्व्ह बँकेने समितीस दिलेला तीन महिन्यांचा कालावधी पाहता, सहकारी बँकांनी त्यांच्या येत्या वार्षिक सभेमध्ये हे नवीन उपविधी मंजूर करून घ्यावेत असे रिझर्व्ह बँकेस वाटते.

एकंदरीतच नवीन आदर्श उपविधीकरिता रिझर्व्ह बँकेने नेमलेली समिती हे नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात पारदर्शकता, व्यावसायिकता, सुशासन आणि नियामक शिस्त वाढविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. परंतु याची अंमलबजावणी करताना सहकार चळवळीची मूलभूत तत्त्वे म्हणजेच लोकशाही व सदस्यांचे नियंत्रण आणि स्वायत्तता यांचे संरक्षण करणे तितकेच महत्त्वाचे व आवश्यक आहे. हा समतोल योग्यप्रकारे साधण्यात या समितीला यश येवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

**– विद्याधर अनास्कर. मो. नं. – ९८५०९७४०७५**

**ईमेल –** Email Id : v_anaskar@yahoo.com

*****

# बहिणाबाई चौधरी विद्यापीठात सहकार अभ्यासक्रमाला मान्यता

## अधिसभा सदस्यपदी नरेंद्र नारखेडे यांची निवड



**फैजपूर, जळगाव –** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने नवीन सहकार पदवी अभ्यासक्रमाला नुकतीच मान्यता दिली आहे, अशी माहिती अधिसभा सदस्य नरेंद्र नारखेडे यांनी सांगितली.

सहकार क्षेत्रात युवकांना नोकरीच्या भरपूर मोठ्या प्रमाणात संधी आहे. यासाठी सहकार विषय प्रशिक्षित पदवीधारक उमेदवारांची गरज आहे. या क्षेत्रात युवकांना संधी उपलब्ध व्हावी, यासाठी सहकार पदवी अभ्यासक्रम सुरू करावा, असा प्रस्ताव विद्यापीठाचे सिनेट अधिवेशनात सदस्य नरेंद्र नारखेडे यांनी मांडला व विस्तृत चर्चा घडवून आणली  कुलगुरू व्ही. एल. माहेश्वरी यांनी तत्त्वतः मान्यता दिली होती अभ्यासक्रमाची रचना ठरविण्यासाठी राजेंद्र नंनवरे व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली नारखेडे व जगताप मॅडम, प्राचार्य जगदीश पाटील यांसह समिती स्थापन करण्यात आली होती.

या प्रस्तावाला विद्यापीठाचे अभ्यास परिषदेत मान्यता देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा व पदवी संपादन करावी. या पदवी धारकांना सहकारी बँक, कारखाना, पतसंस्था, सूतगिरणी, दूधसंघ आणि अन्य सहकारी संस्थांमध्ये नोकरीच्या संधी मिळतील. सहकारी संस्था मजबूत करणे व युवकांना रोजगार निर्माण करणे, ही भूमिका यामागे असल्याची भावना व्यक्त केली.

# सहकाराच्या माध्यमातूनच विकास साधावा लागेल – संतोष बिडवई




**पैठण (छत्रपती संभाजीनगर) –** सहकारातून समृद्धी, सहकारातून विकास व सहकारातून आत्मनिर्भर भारत या संकल्पनेनुसार आता दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. एखादी सहकारी संस्थांची संख्या महत्त्वाची नसून त्यांचा दर्जा महत्त्वाचा आहे. सहकारी संस्थांनी अनुदानावर न थांबता सहकाराच्या माध्यमातूनच विकास साधावा लागेल, असे मत सहकारी संस्था विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई यांनी व्यक्त केले.

केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापनेस पाच वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने राष्ट्रीय सहकार सप्ताह भारतभर साजरा केला जात आहे. पैठण येथे शालिवाहन पतसंस्था व सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय व सहकार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार परिसंवाद'चे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सहकारी संस्था विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई होते.

पतसंस्था काय काम करू शकतात याचे आदर्श उदाहरण म्हणजे पैठणची शालिवाहन पतसंस्था होय, असे नमूद करून ते म्हणाले, सर्वोत्कृष्ट बँकिंगबरोबरच त्यांचे समाजोपयोगी सेवेचे कार्य खरोखर अभिनंदनीय आहे. संत एकनाथ सहकारी रुग्णालयाच्या माध्यमातून गेली ८ वर्षांपासून सेवा देणारे डॉ. पंडित किल्लारीकर यांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

सहकारी संस्था संभाजीनगर जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, सहायक निबंधक बलराम नवथर, महाराष्ट्र ऑडिटर्स असोसिएशन उपाध्यक्ष आबासाहेब देशमुख, सहकार भरतीचे प्रदेश सचिव सुनील मोतलग, शालिवाहन पतसंस्थेचे संचालक डॉ. पंडित किल्लारीकर, संचालक रुपेश चौहान तसेच पैठण तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर चौहान यांनी प्रास्ताविकामध्ये 'सहकाराची शिदोरी देशाला उद्धरी' म्हणजेच सहकाराविना देशाचा विकासाच होऊ शकत नाही. केंद्र शासनाचे नवीन सहकारी धोरण खरोखरच अभिनंदनीय असून त्यामुळे सहकातील मरगळ दूर होऊन सहकार चळवळीला एक नवी ऊर्जा प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी, सहकाराचे खरे मूल्य समजून घेताना सहकारी संस्थांनी सहकारचे तत्त्व रुजवून व आत्मसात करून सभासदांच्या विश्वासाला पात्र राहिले पाहिजे, असे आवाहन केले. सहायक निबंधक बलराम नवथर यांनी, पैठण तालुक्यात ७५ वित्तीय संस्थांचे मोठे जाळे आहे. ६४ हजार खातेदार असताना फक्त १ हजार खातेदारांनाच कर्ज वाटप करण्यात आले. सहकारी संस्थांनी कर्ज वाटप वाढवावे, असे आवाहन केले.

असोसिएशनचे देशमुख यांनी बोलताना, सहकार चळवळीत सहकार कमी पडतो असे जाणवते. शेवटच्या घटकापर्यंत सहकाराची विकासगंगा पोहोचली पाहिजे, यासाठी केवळ एक सप्ताहपुरते काम न करता सहकारी संस्थांनी कायमस्वरूपी काम करावे, असे आवाहन केले. सहकार भारतीचे प्रदेश सचिव सुनील मोतलग यांनी सहकारी संस्था अडचणीत येण्यामागे मुख्य कारण म्हणजे संस्कार नसलेले कार्यकर्ते असतात. सहकारी संस्थांनी राजकीयविरहित काम करत सहकार संस्कृती जपली पाहिजे. परिणामी चांगली फळे आपण समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवू शकतो, असे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क अधिकारी नरेश सिकची, मुख्य अधिकारी अरुणा पिल्लई, शाखा व्यवस्थापक तृप्ती गुरव व प्रीतम घोडके यांनी सहकार गीत सदर केले. मुख्य अधिकारी शिवाजी घोडके यांनी स्वागत केले.

## जिल्हा मध्यवर्ती सह. बँक सीईओ अनिरुद्ध देसाई निवृत्त

**पुणे –** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई हे नुकतेच निवृत्त झाले. त्याबद्दल बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. बँकेचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी तसेच माजी आमदार अशोक पवार आणि कर्मचारी उपस्थित होते. बँकेचे सरव्यवस्थापक संजय शितोळे यांच्याकडे मुख्य कार्यकारी पदाची सूत्रे देण्यात आली आहेत. देसाई यांच्या कार्याचा गौरव उपाध्यक्ष चांदेरे यांनी केला.

# पुणे पीपल्स सहकारी बँकेचा भारतरत्न सहकारिता पुरस्काराने गौरव




**पुणे** – पुणे पीपल्स सहकारी बँकेला नुकतेच भारतरत्न सहकारिता पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. भारत नेटवर्क ग्रुप, नॅफकब आणि पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने लखनौ येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिषदेत पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँक अध्यक्ष श्रीधर गायकवाड, उपाध्यक्ष बिपीनकुमार शहा, बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य सुभाष मोहिते यावेळी उपस्थित होते. बँकेचे हे अमृत महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्ताने सदस्यांसाठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत.

## जिल्हा सहकारी बँकेच्या सभासद शेतकरी यांना कर्जमाफी

**पुणे** – पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या सभासद शेतकरी यांना कर्जमाफी देण्यात येणार आहे, या योजनेअंतर्गत सुमारे ३ लाख १७ हजार ५६९ शेतकरी यांना योजनेचा फायदा होणार आहे. राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना आहे. जिल्हा बँक अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी ही माहिती सांगितली.

कर्जमाफीच्या माध्यमातून शेतकरी यांना सुमारे २ हजार १०२ कोटी ९१ लाख रुपयांची रक्कम मिळणार आहे. तसेच या योजनेनुसार दोन लाखांपर्यंत थकित पीक कर्जासाठी ८३ हजार ३७६ शेतकरी यांना ७४९ कोटी रुपये मिळणे शक्य आहे.

## सहकारी बँकासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेला मुदतवाढ

**मुंबई** – राज्यातील नागरी सहकारी बँकामधील थकीत व अनुत्पादक कर्जाची वसुली वाढविण्यासाठी राज्य शासनाने नागरी सहकारी बँकासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू करून योजनेला ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. सहकार आयुक्ताच्या शिफारशीनंतर हा निर्णय प्रसृत करण्यात आला आहे.

मल्टीस्टेट सहकारी बँका वगळता राज्यातील अन्य सर्व नागरी सहकारी बँकांना ही योजना लागू असणार आहे. राज्यातील नागरी सहकारी बँकांमध्ये वाढत असलेल्या अनुत्पादक कर्जामुळे आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. यापूर्वी या योजनेमुळे एनपीए कमी होण्यास मदत झाल्याने बँकाच्या मागणीनुसार या वेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. ही योजना स्वीकारणे नागरी सहकारी बँकांना बंधनकारक नसले, तरी योजना स्वीकारल्यानंतर सर्व पात्र कर्जदारांना कोणताही भेदभाव न करता समान पद्धतीने लाभ देणे बँकांवर बंधनकारक राहणार आहे.

## रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे** – लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात शंभरपेक्षा अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. संस्थेचे संस्थापक डॉ. किरण ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते राम बांगड, संस्थेचे विभागीय प्रमुख सुशील जाधव यावेळी उपस्थित होते. संस्थेचे खातेदार, ठेवीदार ग्राहक यांनी सहभाग घेतला.

## सहकारी बँकामध्ये कर्मचारी भरती ऑफलाइन

**पुणे** – राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये करण्यात येणारी शिपाई कर्मचारी पदाची भरती यापुढील काळात ऑनलाइन पद्धतीने न करता ऑफलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. मात्र यासाठी उमेदवारांना परीक्षा देण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

मुख्य म्हणजे या भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. जर वरील जागेसाठी स्थानिक उमदवार उपलब्ध न झाल्यास या जागा अन्य जिल्ह्यांमधून भरण्याची सुविधा देण्यात आली आहे, असा आदेश शासनाने प्रसिद्ध केला आहे. असे असले तरी लेखी परीक्षा घेणे बंधनकारक असणार आहे, याची जबाबदारी संचालक मंडळावर असणार आहे.

## धान्य साठवण योजनेअंतर्गत धान्य गोदाम कार्यरत

**पुणे** – आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह तसेच केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवण योजना' आणि कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत जुन्नर तालुक्यातील बेल्हे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्यादित येथे उभारण्यात आलेल्या ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. कार्यक्रमास नाबार्ड, पुणे विभागाचे सरव्यवस्थापक अविनाश सेवळकर, व्यवस्थापक प्रणित राज पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपसरव्यवस्थापक गिरीश जाधव, शेती कर्ज विभागाचे माळी, संस्था सक्षमीकरण समन्वयक रमेश बांडे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक ॲड. संजय काळे, जुन्नरचे सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) डॉ. गजेंद्र देशमुख, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

बेल्हे येथे उभारण्यात आलेल्या या ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सुरक्षित, वैज्ञानिक व आधुनिक धान्य साठवणुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे कृषी उत्पादनाचे मूल्यवर्धन, दर्जेदार साठवण आणि प्रभावी विपणनास चालना मिळणार असून सहकारी संस्थेच्या व्यवसायवृद्धीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासही या प्रकल्पाची मदत होणार आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद आणि भारतीय बीज सहकारी समिती मर्यादित यांच्यात केळी टिश्यू कल्चर प्रयोगशाळा उभारणीसंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. राष्ट्रीय सहकारी डेटाबेस (एनसीडी) पोर्टल ३.० चे जिओ-टॅगिंग सुविधेसह उद्घाटन, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाचा (एनडीडीबी) दुग्ध सहकारी समीक्षा डॅशबोर्ड राष्ट्राला समर्पित करण्यात आला. सहकारी निविष्ठा व सेवा वितरण बहुराज्य सहकारी संस्था मर्यादित सहकारी दूध उत्पादक संघटना बहुराज्य सहकारी संस्था आणि गोमय सहकारी समिती बहुराज्य सहकारी संस्था मर्यादित या नव्या राष्ट्रीय बहुराज्य सहकारी संस्थांच्या पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला.

# सहकारी बँकांसाठी डेटा संरक्षणाची नवी दिशा

भारतातील बँकिंग क्षेत्र झपाट्याने डिजिटल होत आहे. कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग, UPI, Aadhaar Enabled Payment System (आधार सक्षम पेमेंट प्रणाली), DLS (Digital Lending System) डिजिटल कर्ज वितरण प्रणाली अशा सेवांमुळे ग्राहकांचा डेटा मोठ्या प्रमाणावर निर्माण आणि वापरला जात आहे. या पार्श्वभूमीवर डेटा हा केवळ Operational साधन नसून तो बँकेची मूलभूत संपत्ती बनला आहे. परंतु जिथे डेटा आहे, तिथे धोकादेखील आहे. डेटा लीक, सायबर हल्ले, अनधिकृत वापर या गोष्टींमुळे ग्राहकांचा विश्वास ढासळू शकतो.

यासाठीच भारत सरकारने Digital Personal Data Protection Act, 2023 लागू केला आहे आणि RBI ने बँकांना डेटा सुरक्षा व गोपनीयतेबाबत कठोर मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. विशेषतः सहकारी बँकांसाठी हा विषय अधिक महत्त्वाचा आहे, कारण त्यांच्या प्रणाली, मनुष्यबळ आणि IT क्षमता तुलनेने मर्यादित असतात.



**व्यंकटेश कुळकर्णी**
९४०३० ८०७५१

**DPDP Act 2023 : तत्त्वज्ञान आणि उद्दिष्ट :**

DPDP Act 2023 चा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करताना संस्थांना जबाबदार बनवणे. या कायद्याचा पाया तीन प्रमुख तत्त्वांवर आधारित आहे : Consent-based processing - ग्राहकाची स्पष्ट परवानगी.

**Purpose limitation -** ज्या उद्देशासाठी डेटा घेतला, त्याच उद्देशासाठी वापर. Data minimisation - आवश्यक तेवढाच डेटा. प्रमुख संज्ञा (Banking Context मध्ये समजून घेणे) Data Principal – बँकेचा ग्राहक Data Fiduciary – बँक जी डेटा वापरते Data Processor - CBS vendor / IT service provider Consent Manager - consent व्यवस्थापन करणारी प्रणाली. या संकल्पना बँकिंग ऑपरेशन्समध्ये थेट लागू होतात, विशेषतः KYC, lending आणि digital transactions मध्ये. ग्राहकांचे अधिकार बँकांसाठी नवी जबाबदारी DPDP Act अंतर्गत ग्राहकांना खालील अधिकार दिले आहेत:

डेटा Access करण्याचा अधिकार, Correction आणि Updation करण्याचा अधिकार डेटा Erase करण्याचा अधिकार, Grievance redressal करण्याचा अधिकार, याचा अर्थ असा की, बँकांनी आता Customer data lifecycle पूर्णपणे व्यवस्थापित करणे आवश्यक आहे. Consent Management : बँकिंगमधील सर्वात मोठा बदल. DPDP Act मुळे बँकिंगमध्ये सर्वात मोठा बदल Consent Managementमध्ये दिसून येतो.

Free (स्वेच्छेने दिलेली), Specific (ठराविक उद्देशासाठी), Informed (पूर्ण माहिती देऊन), Unambiguous (स्पष्ट), अशी असणे आवश्यक आहे. उदाहरण: KYC साठी घेतलेला डेटा Marketing साठी वापरायचा असेल तर स्वतंत्र Consent आवश्यक आहे.

**Data Protection Principles बँकांनी काय पाळावे** : Purpose Limitation, ग्राहकाचा डेटा फक्त ठरलेल्या उद्देशासाठी वापरणे, Storage Limitation, उद्देश पूर्ण झाल्यानंतर डेटा ठेवू नये, Security Safeguards, Encryption, access control, audit trail यांची अंमलबजावणी,

**RBI मार्गदर्शक तत्त्वे : सहकारी बँकांसाठी काय अपेक्षित?**

Reserve Bank of India ने विविध Circulars द्वारे डेटा सुरक्षा आणि ITGovernance बाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

**1) IT Governance Framework -** बँकेने IT policy तयार करणे Board level oversight ठेवणे, Information Security Policy लागू करणे.

**2) Cyber Security Framework, Cyber audit नियमित करणे**

Vulnerability assessment आणि Penetration testing Incident response mechanism तयार ठेवणे.

**3) Data Breach Reporting, RBI नुसार :** सायबर घटना त्वरित रिपोर्ट करणे आवश्यक. काही प्रकरणात ६ तासांत reporting अपेक्षित. DPDP Act नुसार Data Protection Board ला breach कळवणे आवश्यक (साधारण ७२ तासाच्या चौकटीत)

यामुळे dual reporting requirement निर्माण होते.

*** DPDP Act आणि RBI नियमांमधील संघर्ष (Conflicts) :-**

Retention vs Erasure, RBI' डेटा ठराविक काळासाठी ठेवणे आवश्यक, DPDP ' उद्देश संपल्यावर delete करणे, Breach Reporting Timeline,RBI फ त्वरित / काही तासांत, DPDP' निश्चित वेळेत (reasonable time)

* बँकांनी यासाठी integrated compliance policy तयार करणे अत्यावश्यक आहे.

*** सहकारी बँकांसाठी आव्हाने:** IT infrastructure मर्यादित, Skilled manpower कमी, Vendor dependency जास्त, Compliance awareness कमी, त्यामुळे DPDP compliance हे फक्त कायदेशीर नव्हे तर Operational challenge आहे.

*** Governance Framework : बँकांनी काय करावे?**

Data Protection Officer (DPO) नेमणे, डेटा संरक्षणासाठी जबाबदार अधिकारी.

RoPA (Records of Processing Activities), डेटा कुठे आणि कसा वापरला जातो याची नोंद, Board Level Accountability, डेटा संरक्षण हा management चा मुख्य विषय बनवणे, Banking Operations मध्ये DPDPची अंमलबजावणी, KYC Process, फक्त आवश्यक माहिती घेणे, consent document करणे, Loan Processing, डेटा sharing करताना consent घेणे, third-party risk व्यवस्थापित करणे, Digital Banking, mobile apps मध्ये privacy by design, मजबूत authentication प्रणाली, Non-Complianceचे परिणाम, DPDP Act अंतर्गत: मोठे आर्थिक दंड (crores मध्ये), Data Protection Board द्वारे चौकशी.

*** प्रतिष्ठेवर परिणाम –** * सहकारी बँकांसाठी हे विशेषतः गंभीर आहे. कारण त्यांचा व्यवसाय विश्वासावर आधारित असतो. Integrated Compliance Strategy पुढील दिशा – बँकांनी खालील integrated approach स्वीकारणे आवश्यक आहे : IT + Legal + Risk management यांचा समन्वय, Cyber security आणि data privacy एकत्रित करणे, नियमित training आणि awareness कार्यक्रम

*** निष्कर्ष:** DPDP Act २०२३ मुळे भारतीय बँकिंग क्षेत्रात डेटा संरक्षणाचे नवीन युग सुरू झाले आहे. सहकारी बँकांसाठी हा केवळ Complianceचा विषय नसून ग्राहकांचा विश्वास टिकवणे, डिजिटल स्पर्धेत टिकून राहणे, आणि सुरक्षित बँकिंग व्यवस्था निर्माण करणे, या सर्वांचा आधार आहे. Reserve Bank of India च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि Digital Personal Data Protection Act, 2023च्या अंमलबजावणीद्वारे बँकांनी Data Protection Culture विकसित करणे ही काळाची गरज आहे. बँकर्स म्हणून आपण हा विचार नक्कीच केला पाहिजे की ग्राहकाचा डेटा म्हणजे विश्वास आणि विश्वासाचे संरक्षण हेच बँकिंगचे खरे तत्त्व आहे.

**– व्यंकटेश कुळकर्णी, प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित पुणे.**
**मो.नं. – ९४०३० ८०७५१**

*****

# नागरी सहकारी बँकांसाठी आदर्श उपविधीचा निर्णय स्वागतार्ह -अनास्कर

**पुणे** – नागरी सहकारी बँकांसाठी नव्याने आदर्श उपविधी तयार करण्याचा आरबीआयचा निर्णय हा स्वागतार्ह असून यामुळे नागरी सहकारी बँका कॉर्पोरेट होण्यास हातभार लागणार आहे, असे मत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक आणि बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे.

ते म्हणाले, सहकार हा पूर्णपणे राज्याच्या कक्षेतला विषय असून सहकार कायद्यातील तरतुदींनुसार सहकारी संस्थांचे आदर्श उपविधी तयार करण्याचे सर्व अधिकार राज्याच्या सहकार निबंधक यांना आहेत. नवीन उपविधीमुळे बँकामध्ये व्यावसायिकता, चांगले सुशासन, पारदर्शकता आणि भांडवल उभारणीला मदत होणार आहे. तसेच व्यावसायिक व्यवस्थापनाला चालना मिळून ठेवीदार यांचा विश्वास वाढणार आहे असे ते म्हणाले.



## राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर कर्जमुक्ती योजना समितीवर

**पुणे** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या समितीवर राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीवर राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. राष्ट्रीयीकृत बँक, खासगी बँक आणि ग्रामीण भागातील बँक यांच्याकडील शेतकऱ्यांची पीक कर्ज, एनपीए खाती, ओटीएस योजना अशा विविध विषयासाठी समिती तयार करण्यात आली आहे.

## कॉसमॉस बँक व्यवस्थापन मंडळ अध्यक्षपदी संजीव खडके



**पुणे** – कॉसमॉस बँकेच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये संजीव नरहरी खडके यांची व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. दोन वर्षांपासून बँकेच्या व्यवस्थापन मंडळातील सदस्य म्हणून ते कार्यरत आहेत.

अमरनाथ अशोक चक्रदेव व दीपक नाथाजी माने यांचा व्यवस्थापन मंडळाचे सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. खडके यांना 'सहकारी बँकिंग सार्वजनिक प्रशासन, कृषी बाजार प्रशासन' या क्षेत्राचा ३६ वर्षांहून अधिक कामकाजाचा अनुभव आहे. राज्यातील सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे, प्रशासकीय निर्णयांची अंमलबजावणी करणे आदी कामांचा त्यांना अनुभव आहे.

## सन्मित्र सहकारी बँकेचा बेस्ट अर्बन को-ऑप. बँक पुरस्काराने गौरव

**पुणे** – येथील सन्मित्र सहकारी बँकेला बेस्ट अर्बन को-ऑप. बँक आणि बेस्ट एनपीए मॅनेजमेंट या दोन पुरस्कारांनी नुकतेच गौरविण्यात आले आहे. सहकार क्षेत्रातील उत्तम व्यवस्थापन, ग्राहकाभिमुख सेवा आणि पारदर्शी कामकाज यामुळे बँकेला गौरविण्यात आले आहे.

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन आणि भारत नेटवर्क ग्रुप व नॅफकब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत पुरस्कार प्रदान करण्यात आले. संस्था अध्यक्ष गणेश फुलारे यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी बँक संचालक आणि सहकार क्षेत्रातील अभ्यासक उपस्थित होते.

## राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्षपदी ॲड. दीपक पटवर्धन



**पुणे** – राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नागिरी येथील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपनिबंधक मिलिंद टांकसाळे यांनी कामकाज पाहिले.

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे उपस्थित होते. ते म्हणाले की, युद्धजन्य परिस्थिती, इंधनाचे वाढते दर यामुळे अर्थविश्वासमोर एक आव्हानात्मक परिस्थिती उद्‌भवली आहे. पतसंस्थांसमोर देखील नवीन आव्हाने उभी राहत आहेत, अशा परिस्थितीत राज्यभरातील सुमारे १९ हजार पतसंस्थांना सक्षम नेतृत्व मिळाले आहे. पतसंस्था फेडरेशनचे संस्थापक संचालक वसंत शिंदे, माजी अध्यक्ष ओमप्रकाश तथा काका कोयटे, उपाध्यक्ष डॉ. शांतीलाल सिंगी, महासचिव शशिकांत राजोबा आणि सर्व संचालक सदस्य उपस्थित होते.

राज्य पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी ॲड. पटवर्धन यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सहाकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार किरण सामंत, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष व आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रसाद लाड आदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या अध्यक्षपदी अरुण चांभारे



**पुणे** – पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्षपदी अरुण सिताराम चांभारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संघाच्या संचालक मंडळाची विशेष सभा झाली. नवनिर्वाचित अध्यक्ष अरुण चांभारे यांचा संघाचे सर्व संचालक, संघातील कामगार व कर्मचारी वर्गाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नवनिर्वाचित अध्यक्ष चांभारे म्हणाले, पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या सर्व संचालक मंडळाला बरोबर घेऊन संघाची उन्नती व प्रगती केली जाईल. जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे अधिकाधिक आर्थिक हित साधणे, हेच प्रथम प्राधान्य असेल.

# सहकार भारती, धुळे शाखा आयोजित कार्यशाळा यशस्वी




**धुळे –** सहकार भारती, धुळे महानगर व धुळे जिल्हा यांच्या वतीने पशुपालनातून शेतकऱ्यांना शाश्वत व पूरक उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना आणि नाशिकच्या कार्डियन करेक्ट इंटरनॅशनल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

पशुपालनातून शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी 'केंद्र व राज्य शासनाचा पुढाकार – शेतकऱ्यांसाठी संधी' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेची सविस्तर माहिती, लाभ, अर्ज प्रक्रिया नोंदणी तसेच पशुपालन व्यवसायातील विविध संधी यांविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले डॉ. संतोष उमाजी शिंदे (योजना समन्वयक पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, आयुक्त) यांनी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता' योजनेची अंमलबजावणी, अनुदान व लाभ' याविषयी मार्गदर्शन केले. तसेच याशिवाय सुजित वाबळे (फूड टेक्नॉलॉजिस्ट) यांनी 'दुग्ध पदार्थातील मूल्यवर्धनाच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करून दुग्धजन्य उत्पादनांद्वारे अधिक उत्पन्न कसे मिळवता येईल, याविषयी माहिती सांगितली.

डॉ. निकम यांनी विविध लसीकरणबाबत मार्गदर्शन केले. बन्सीलाल अंदोरे, नाशिक विभाग प्रमुख, रवींद्र अमृतकर, प्रकोष्ठ प्रमुख – धुळे जिल्हा, संघटनमंत्री शशिकांत चौधरी, गोपीचंद नाना पाटील उपस्थित होते. सचिन पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. महिला प्रमुख प्रीती त्रिवेदी, धुळे महानगर महामंत्री कृष्णा जाधव, सुभाष पाटील, अविनाश भदाणे, ज्ञानेश्वर पाटील, राजेंद्र माळी, सुरेश चौधरी, धीरज वाघ व सहकार भारती पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नागरी सहकारी बँक संचालकांसाठी आयोजित कार्यशाळा यशस्वी

**चिपळूण –** सहकारी बँकांच्या संचालकांसाठी चिपळूण येथे मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचा प्रारंभ टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष व सहकार भारतीचे पश्चिम क्षेत्र प्रमुख शरद गांगल यांच्या बीज भाषणाने झाला. त्यांनी 'सहकारी बँकांच्या प्रगतीचा मार्ग' विषयाची मांडणी केली. जगभरातील आर्थिक घडामोडी, भारतातील तरुणांना तयार होणाऱ्या कौशल्य संधी, सहकारी बँकांमधील परस्पर सहकार्याने सहभाग, कर्जांची योजना, सरकारी खात्यांच्या व्यवसायात सहकारी बँकांचा सहभाग इत्यादी विषयांचा ऊहापोह  केला.

सहकारी बँकांच्या संचालकांना व त्यांच्या नातेवाइकांना द्यावयाच्या कर्जाबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेने नव्याने निर्देश दिले आहेत. त्या निर्दे शांबाबतची सविस्तर माहिती दापोली अर्बन को-ऑप. बँकेचे अध्यक्ष जयवंत जालगांवकर यांनी सांगितली. सहकारी बँकांच्या संचालकांनी काय करावे, काय करू नये. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांची उजळणी बेसिन कॅथलिक को-ऑप. बँकेचे अध्यक्ष बेनॉल्ड डायस यांनी मार्गदर्शनात केली.

कार्यशाळेचा समारोप भारतीय रिझर्व्ह बँक व नाबार्डचे संचालक तसेच सहकार भारतीचे संस्थापक सदस्य सतीश मराठे यांनी केला. सहकारी बँकांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सहकारी बँकांनी चांगली कामगिरी केली असल्याचा उल्लेख रिझर्व्ह बँकेने त्यांच्या वार्षिक अहवालात केला आहे. त्यामुळे सर्वांनी आत्मविश्वासाने काम करण्याची आवश्यकता आहे. लघुउद्योजकांना सुमारे एक लाख कोटी कर्ज पुरवठ्याची आवश्यकता आहे आणि ही गरज पुरवण्याची क्षमता नागरी सहकारी बँकांमध्ये नक्कीच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यशाळेच्या प्रारंभी सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे अध्यक्ष संजय बिर्ला यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात संस्थेची सविस्तर माहिती सांगितली, तसेच प्रशिक्षणाचे महत्त्व विशद केले. संस्थेचे उपाध्यक्ष शरद जाधव यांनी आभार  मानले. सूत्रसंचालन संचालक उदय पेंडसे यांनी केले. यावेळी संचालक सदानंद पावगी उपस्थित होते. कार्यशाळेत १२ सहकारी बँकांचे ३० अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

## सांगली सहकारी बँक, मुंबई शाखा कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग

**मुंबई –** सांगली सहकारी बँक, मुंबई शाखेतील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. बँकिंगची तोंडओळख, बँकिंगमधील विविध योजना हे विषय वैशाली टोकरे यांनी सादरीकरणासह सविस्तरपणे मांडले. मार्केटिंग, बँकिंगसाठी आवश्यक विविध कौशल्ये या विषयांची मांडणी मनीषा मोकाशी यांनी केली. तसेच विविध व्यवस्थापकीय खेळ घेतले. प्रशिक्षण वर्गात बँकेचे संचालक सुनील हेमगुडे, तज्ज्ञ संचालक ॲड. श्रीकांत चव्हाण, सल्लागार करकरे, कार्यकारी संचालक भोसले, सरव्यवस्थापक भिसे उपस्थित होते. सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे संचालक उदय पेंडसे यांनी संस्थेची माहिती सांगितली. प्रशिक्षणास ३० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## गोदावरी अर्बन महागाव शाखेचा वर्धापनदिन साजरा

**नांदेड –** येथील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी महागाव शाखेचा वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने तहसील कार्यालयातील नागरिक, कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या सुविधेचे उद्घाटन संस्थेचे सहायक महाव्यवस्थापक रवी इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. तहसिलदार अभय म्हस्के यावेळी उपस्थित होते. यावेळी सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, उपमहाव्यवस्थापक सुरेखा दवे आदी उपस्थित होते.

## विश्वेश्वर सहकारी बँकेच्या वतीने रोप वाटप

**पुणे –** जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने दि विश्वेश्वर सहकारी बँकेच्या वतीने सर्व शाखांमध्ये रोप वाटपाचा उपक्रम करण्यात आला. बँक अध्यक्ष अनिल गाढवे यांच्या नेतृत्त्वाखाली बँकेच्या ३० शाखांमधून सुमारे पांच हजार रोपांचे वाटप करण्यात आले. विविध शाखांमध्ये वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन शपथ, स्वच्छता अभियान आणि पर्यावरण संरक्षण यावर जागृती करण्यात आली.

# संचित तोटा निर्लेखन हे तर सहकारी संस्थांना नवसंजीवन

कोणत्याही व्यवसायात नफा आणि तोटा हे अपरिहार्य घटक असतात. एखाद्या विशिष्ट कालावधीत झालेला तोटा हा केवळ व्यवस्थापनातील त्रुटींमुळेच होतो असे नाही; आर्थिक मंदी, शासनाच्या धोरणांतील बदल, बाजारपेठेतील चढ-उतार, नैसर्गिक आपत्ती तसेच इतर बाह्य कारणांचाही त्यात मोठा वाटा असू शकतो. अनेक सहकारी संस्थांचा परिचलन नफा (Operating Profit) समाधानकारक असतो आणि त्यांचा मूलभूत व्यवसाय सक्षमपणे सुरू असतो; मात्र पूर्वीच्या वर्षांतील मोठ्या संचित तोट्यामुळे निव्वळ नफा (Net Profit) दिसून येण्यासाठी अनेक वर्षे लागतात. परिणामी, प्रत्यक्ष आर्थिक सुधारणा होत असूनही ताळेबंदावरील संचित तोटा संस्थेच्या आर्थिक प्रतिमेवर विपरीत परिणाम करतो तसेच सभासद, ठेवीदार, कर्जदार, नियामक संस्था आणि जनमानसात संस्थेबाबत नकारात्मक धारणा निर्माण होण्याची शक्यता असते.




गणेश निमकर

९८२२५ ६८५५०


अशा परिस्थितीत संचित तोटा निर्लेखन ही केवळ लेखांकनाची प्रक्रिया नसून, संस्थेची आर्थिक स्थिती वास्तवदर्शीपणे प्रतिबिंबित करून आर्थिक पुनरुज्जीवन, विश्वास पुन:स्थापना आणि भविष्यातील शाश्वत विकासाचा पाया मजबूत करणारा प्रभावी कायदेशीर उपाय ठरू शकतो. भारतीय कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ६६ अंतर्गत कंपन्यांना आवश्यक मंजुरीनंतर भागभांडवलाची पुनर्रचना करून संचित तोटा राखीव निधी किंवा अदा केलेल्या भागभांडवलाविरुद्ध समायोजित (Write-off) करण्याची परवानगी आहे. उद्योग क्षेत्रात ही प्रक्रिया व्यापकपणे स्वीकारली गेली असून, अनेक कंपन्यांनी विविध कालावधीत न्यायाधिकरणाच्या मंजुरीने अशा प्रकारची भांडवली पुनर्रचना केली आहे. यावरून संचित तोटा निर्लेखन आणि भागभांडवल पुनर्रचना ही आर्थिक पुनरुज्जीवनासाठी कायदेशीरदृष्ट्या मान्यताप्राप्त व व्यवहार्य प्रक्रिया असल्याचे स्पष्ट होते.



सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था आणि इतर सहकारी वित्तीय संस्था विविध कारणांमुळे आर्थिक अडचणीत येऊन मोठा संचित तोटा निर्माण होऊ शकतो. मात्र, अनेक संस्थांकडे पुरेसा स्वनिधी, राखीव निधी, भागभांडवल आणि इतर स्वनिधी उपलब्ध असल्याने त्यांचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) समाधानकारक असते. तरीही ताळेबंदावरील संचित तोट्यामुळे नवीन भागभांडवल उभारणे, नवीन सभासद व ठेवी आकर्षित करणे, सभासदांचा विश्वास संपादन करणे, अत्यावश्यक खर्चावर मर्यादा येणे तसेच व्यवसायाचा विस्तार करणे कठीण होते. परिणामी, आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही संस्था कमकुवत असल्याची प्रतिमा निर्माण होते आणि निधी उभारणी, नियामक अनुपालन तसेच लेखापरीक्षण वर्गवारीवरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वाढते.

अशा परिस्थितीत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ४९ हा महत्त्वाचा कायदेशीर पर्याय उपलब्ध करून देतो. सामान्यतः हा नियम केवळ बुडीत कर्जे निर्लेखनापुरता मर्यादित असल्याचा समज आहे; परंतु नियम ४९ मध्ये वैधानिक लेखापरीक्षकाने वसूल न होण्याजोगा म्हणून प्रमाणित केलेला संचित तोटा तसेच इतर वसूल न होणारा तोटा, आवश्यक मंजुरीनंतर बुडीत कर्ज निधी, राखीव निधी किंवा भागभांडवलातून निर्लेखित करण्याची स्पष्ट तरतूद आहे. विशेष म्हणजे, सन १९६१ पासून ही तरतूद अस्तित्वात असूनही, माझ्या माहितीनुसार आणि उपलब्ध नोंदींवरून नियम ४९ अंतर्गत केवळ बुडीत कर्ज निर्लेखनापुरती तरतूद मर्यादित व स्वरूपात वापरली जात आहे.

याउलट काही संस्था नियम ५४ अंतर्गत राखीव निधीचा विनियोग करून अनुत्पादित कर्जांवरील (NPA) तरतुदींचा भार कमी करण्याचा मार्ग अवलंबतात; मात्र नियम ४९ मधील संचित तोटा निर्लेखन व भागभांडवल पुनर्रचनेचा अधिक पारदर्शक, कायदेशीर आणि दीर्घकालीन परिणामकारक पर्याय मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिलेला दिसतो. याच कारणामुळे आज अनेक सहकारी संस्था परिचालन नफ्यात (Operating Profit) असूनही, पूर्वीच्या वर्षांतील संचित तोट्यामुळे त्यांच्या आर्थिक प्रगतीवर मर्यादा येतात. अशा संस्थांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ४९ हा केवळ लेखांकनाचा पर्याय नसून, आर्थिक पुनरुज्जीवन, विश्वास पुन:स्थापना आणि संस्थेला नवसंजीवनी देणारे प्रभावी कायदेशीर साधन ठरू शकतो.

नियम ४९ची शब्दरचना बारकाईने अभ्यासल्यास त्याची व्याप्ती केवळ बुडीत कर्जांच्या निर्लेखनापुरती मर्यादित नसल्याचे स्पष्ट होते. कलम ८१ अन्वये नियुक्त लेखापरीक्षकाने वसूल न होणारी म्हणून प्रमाणित केलेली बुडीत कर्जे, त्यावरील व्याज, वसुली खर्च तसेच संचित तोटा किंवा इतर वसूल न होणारा तोटा, आवश्यक मंजुरीनंतर बुडीत कर्ज निधी, राखीव निधी अथवा भागभांडवलातून निर्लेखित करण्याची स्पष्ट तरतूद या नियमात आहे.

राखीव निधी आणि भागभांडवल हे संस्थेच्या निव्वळ मालमत्तेचे व सभासदांच्या आर्थिक हितसंबंधांचे मूलभूत घटक असल्याने, अशा निर्लेखनाचा निर्णय अत्यंत जबाबदारीने आणि विहित कायदेशीर प्रक्रियेचे पालन करूनच घेणे आवश्यक आहे. यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी तसेच आवश्यकतेनुसार निबंधक आणि संबंधित वित्तीय संस्थेची पूर्वलेखी मंजुरी आवश्यक ठरते. तसेच, भागभांडवलाच्या संरचनेत बदल होत असल्याने नियम १६ आणि संस्थेच्या उपविधींमधील विहित कार्यपद्धतीचे पालन करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे नियम ४९ आणि नियम १६ यांचा समन्वित वापर केल्यास संस्थेची आर्थिक पुनर्रचना कायदेशीर, पारदर्शक, नियामकदृष्ट्या सुसंगत आणि सभासदांच्या हितांचे संरक्षण करणाऱ्या पद्धतीने प्रभावीपणे राबविता येते.

संचित तोटा निर्लेखन ही केवळ ताळेबंदातील लेखाशास्त्रीय समायोजन (Accounting Adjustment) प्रक्रिया असून, त्याद्वारे संस्थेची आर्थिक स्थिती अधिक वास्तवदर्शी स्वरूपात प्रतिबिंबित होते. या प्रक्रियेमुळे संस्थेच्या प्रत्यक्ष मालमत्ता, दायित्वे, रोख प्रवाह, उत्पन्ननिर्मितीची क्षमता किंवा व्यवसायात कोणताही बदल होत नाही; मात्र संचित तोट्याचा आर्थिक विवरणपत्रांवरील विपरीत परिणाम दूर होऊन निव्वळ मालमत्ता (Net Assets), स्वनिधी (Net Worth), भागमूल्य (Book Value), भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) आणि इतर वित्तीय प्रमाणके अधिक अचूक व विश्वासार्ह स्वरूपात दिसून येतात.

निर्लेखनाचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे, त्यानंतरच्या वर्षांतील परिचालन नफा संचित तोट्यात समायोजित न होता थेट निव्वळ नफा

पुढील पानावर...

मागील पानावरून...

# संचित तोटा निर्लेखन हे तर सहकारी संस्थांना नवसंजीवन

(Net Profit) म्हणून आर्थिक विवरणपत्रांत प्रतिबिंबित होतो. त्यामुळे संस्थेची वास्तविक नफाक्षमता स्पष्टपणे दिसून येते आणि तिच्या आर्थिक कामगिरीचे पारदर्शक व विश्वासार्ह चित्र सर्व संबंधित घटकांसमोर येते. परिणामी, संस्थेची विश्वासार्हता, पतक्षमता आणि भविष्यातील विकासाची क्षमता अधिक बळकट होते.

निर्लेखन हा अंतिम उपाय नसून आर्थिक पुनरुज्जीवनाचा प्रारंभबिंदू आहे. राखीव निधी व भागभांडवलातून संचित तोटा निर्लेखित केल्यानंतर, भावी नफ्यातून त्यांची टप्प्याटप्प्याने पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. यासाठी व्यवहार्य व्यवसाय आराखडा, भांडवली गरज, जोखीम व्यवस्थापन आणि दीर्घकालीन पुनर्भांडवलीकरण (Recapitalisation) यांचा समन्वित आराखडा तयार करणे ही संस्थेची महत्त्वाची आर्थिक व व्यवस्थापकीय जबाबदारी आहे. निर्लेखित भागभांडवलाच्या पुनरुज्जीवनासाठी संस्थेच्या नफाक्षमतेचा वास्तववादी अंदाज घेऊन, प्रकल्पित नफ्याच्या आधारे वार्षिक टप्प्यांत (उदाहरणार्थ : ७ ते १० वर्षे) प्रत्येक आर्थिक वर्षात निव्वळ नफ्याच्या विनियोजनापूर्वी भागभांडवल पुनरुज्जीवन तरतूद (Capital Restoration Provision) निर्माण करून निर्लेखित भागभांडवलाची पुनर्बांधणी करता येते. त्यानंतर संस्थेच्या आर्थिक क्षमतेनुसार राखीव निधीचीही पुनर्बांधणी करता येते. या कालावधीत लाभांश वितरण, नफ्याचे विनियोजन तसेच इतर नियामक अटींवर आवश्यक निर्बंध ठेवून आर्थिक शिस्त राखणे अपेक्षित असते. अशा प्रकारे, संचित तोटा निर्लेखन, भागभांडवल पुनर्रचना आणि नियोजनबद्ध पुनर्भांडवलीकरण हे संस्थेच्या आर्थिक पुनरुज्जीवनाचे परस्परपूरक टप्पे असून, या प्रक्रियेमुळे ताळेबंद अधिक वास्तवदर्शी व विश्वासार्ह बनतो, वित्तीय स्थैर्य, पतक्षमता आणि भांडवलाची गुणवत्ता सुधारते तसेच सभासद, ठेवीदार व नियामक संस्थांचा विश्वास दृढ होऊन संस्थेच्या शाश्वत विकासाला भक्कम आधार मिळतो.



तथापि, नियम ४९ अंतर्गत संचित तोटा निर्लेखन व भागभांडवल पुनर्रचना ही सर्व संस्थांसाठी सरसकट लागू होणारी प्रक्रिया नाही. प्रत्येक संस्थेची आर्थिक स्थिती, संचित तोट्याची कारणे, भविष्यातील नफाक्षमता, व्यवसायाची व्यवहार्यता, व्यवस्थापनाची क्षमता, व्यवसाय आराखडा आणि सभासदांच्या हितांचे संरक्षण यांचा सखोल विचार करूनच हा निर्णय घ्यावा लागतो. विशेषतः आता सहकारी बँकांच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियम, बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक अपेक्षांनुसार आवश्यक मंजुरी घेणे अपरिहार्य आहे. त्यामुळे ही तरतूद केवळ लेखाशास्त्रीय उपाय नसून, सक्षम व्यवसाय आराखडा, आर्थिक शिस्त आणि कायदेशीर व नियामक मंजुरीच्या आधारे वापरावयाचा आर्थिक पुनर्रचनेचा प्रभावी कायदेशीर पर्याय आहे.

या लेखातील मांडणी केवळ महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ४९ च्या तरतुदींवर आधारित नसून, त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील माझ्या अनुभवावरही आधारित आहे. सन २०१९-२०२० मध्ये सातारा जिल्ह्यातील एका सहकारी बँकेत नियम ४९ अंतर्गत संचित तोटा निर्लेखन व भागभांडवल पुनर्रचनेची प्रक्रिया राबविताना, संबंधित बँकेचा सल्लागार म्हणून मी या तरतुदीचा कायदेशीर आधार, उद्देश आणि उपयुक्तता याविषयी तत्कालीन सहकार आयुक्त व निबंधक अनिल कवडे, अपर निबंधक, शैलेश कोतमिरे आणि उपनिबंधक आनंद कटके यांच्यासमोर सविस्तर मांडणी केली. सर्व कायदेशीर, आर्थिक व नियामक पैलूंचा विचार करून या पुनर्रचनेस मान्यता देण्यात आली. प्रशासकीय परंपरेत अधिकाऱ्यांचा नामोल्लेख सहसा टाळला जात असला, तरी या नावीन्यपूर्ण आणि दूरदर्शी निर्णयप्रक्रियेला त्यांनी दिलेल्या विधायक व कायदेशीर पाठबळामुळे हा प्रयोग यशस्वी होऊ शकला. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे हे माझे नैतिक कर्तव्य आहे.

ही प्रक्रिया राबविण्यात आली त्या वेळी बँकिंग नियमन (सुधारणा) अधिनियम, २०२० लागू झालेला नसल्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्वमान्यता आवश्यक नव्हती. त्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वैधानिक तपासणीदरम्यान (Inspection) संपूर्ण प्रक्रियेची सखोल छाननी करण्यात आली. प्रारंभी उपस्थित झालेल्या शंकांचे कायदेशीर, लेखाशास्त्रीय व आर्थिक स्पष्टीकरण समाधानकारक ठरल्यानंतर या प्रक्रियेबाबत कोणताही आक्षेप नोंदविण्यात आला नाही. यावरून ही पुनर्रचना त्या वेळी लागू असलेल्या कायदेशीर व नियामक चौकटीशी पूर्णपणे सुसंगत असल्याचे स्पष्ट झाले.

पुढील काही वर्षांत या निर्णयाचे सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून आले. अनेक वर्षे संचित तोट्याखाली असलेली ती सहकारी बँक सातत्याने नफ्यात आली, निर्लेखित भागभांडवलाचे पुनरुज्जीवन पूर्ण केले, सभासदांना लाभांश देण्याच्या स्थितीत पोहोचली आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची मान्यता मिळवून मोबाईल बँकिंग सेवा सुरू केली. एकेकाळी ज्या बँकेच्या विलीनीकरणाची प्रक्रिया झाली होती, तीच बँक आज आर्थिक पुनरुज्जीवनाचे यशस्वी उदाहरण ठरली आहे.

या प्रयोगाच्या यशामागे नियम ४९ ची प्रभावी अंमलबजावणी, संचालक मंडळाची दूरदृष्टी, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समर्पण, सभासद व ठेवीदारांचा विश्वास आणि सक्षम व्यवस्थापन यांचे मोलाचे योगदान होते. संबंधित संस्थेचे हित, व्यावसायिक गोपनीयता आणि प्रशासकीय नैतिकता तसेच या प्रयोगाच्या यशस्वितेची पूर्ण खात्री होईपर्यंत हा अनुभव सार्वजनिकपणे मांडलेला नव्हता. मात्र, त्याचे सकारात्मक परिणाम सिद्ध झाल्यानंतर सहकार क्षेत्राला नियम ४९ चा योग्य संदर्भ, व्याप्ती आणि उपयुक्तता समजावी, या उद्देशाने तो प्रथमच मांडला आहे. यावरून संचित तोटा निर्लेखन, भागभांडवल पुनर्रचना आणि नियोजनबद्ध पुनर्भांडवलीकरण हा तोटा लपविण्याचा उपाय नसून, कायद्याने मान्यता दिलेला आर्थिक पुनर्रचनेचा प्रभावी पर्याय असल्याचे स्पष्ट होते.

माझ्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांमध्ये नियम ४९ अंतर्गत प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेला हा कदाचित एकमेव प्रयोग असावा; तथापि, अधिकृत सार्वजनिक नोंदी उपलब्ध नसल्यामुळे हा उल्लेख माझ्या माहितीच्या मर्यादेत केला आहे. अशा प्रकारचे प्रयोग योग्य कायदेशीर चौकटीत अधिक प्रमाणात राबविल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या अनेक सहकारी संस्थांना नवसंजीवनी मिळून त्या अधिक सक्षम होतील आणि सहकार चळवळीवरील विश्वास अधिक दृढ होईल.

विशेषतः आर्थिक अडचणीत असलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी सहकार विभाग आणि पतसंस्था फेडरेशन्स यांनी संयुक्तपणे नियम ४९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे, मानक कार्यपद्धती (SOP) आणि आवश्यक धोरणात्मक उपक्रम विकसित करण्याचा सकारात्मक विचार करणे, ही काळाची गरज आहे.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल – nimkarganeshgmail.com** ✻✻✻✻

# अंतिम प्रवासात सहकाराची प्रेरणादायी व माणुसकीची साथ...

काही भेटी अशा असतात, की त्या केवळ व्यक्तींशी होत नाहीत, तर एका विचाराशी, एका संस्काराशी आणि समाजासाठी जगणाऱ्या कार्याशी होत असतात. अलीकडे सहकार भारतीच्या प्रवासाच्या निमित्ताने इचलकरंजी येथे जाण्याचा योग आला. सहकार भारतीचे कोल्हापूर विभागाचे सहविभाग प्रमुख जवाहरलाल छाबडा यांच्यासोबत श्री जैन यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान त्यांच्या कार्याचा एक असा पैलू समजला, ज्याने मन अक्षरशः भारावून गेले.



जवाहरलाल छाबडा

जवाहरलाल छाबडा हे व्यवसायाने करसल्लागार असून 'आर्य चाणक्य पतपेढी'चे संस्थापक अध्यक्ष आहेत. सहकार क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. मात्र, त्याहूनही मोठे कार्य त्यांनी समाजातील अत्यंत संवेदनशील अशा क्षेत्रात उभे केले आहे. गेली पंचवीस वर्षे ते आणि त्यांचे सहकारी 'चाणक्य अंत्यसंस्कार सेवा' या माध्यमातून समाजसेवेचा एक अनोखा आणि माणुसकीचा वसा जपत आहेत.

मृत्यू हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अटळ सत्य आहे. पण कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर दुःखाने खचलेल्या कुटुंबाला अंत्यविधीच्या व्यवस्थेची धावपळ करावी लागते. अशा वेळी मदतीचा हात पुढे करणारी ही संस्था म्हणजे अनेकांसाठी मोठा आधार ठरते. केवळ संस्थेच्या कार्यालयात नोंदणी केल्यानंतर अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या सर्व व्यवस्था संस्थेचे कार्यकर्ते स्वतःच्या जबाबदारीवर पूर्ण करतात. या सेवेसाठी संस्था केवळ पंधराशे रुपये मानधन स्वीकारते. प्रत्यक्षात खर्च त्यापेक्षा दुप्पट (अंदाजे तीन हजार) असला तरी समाजातील दानशूर व्यक्ती आणि हितचिंतकांच्या सहकार्यामुळे हा सेवायज्ञ अखंडपणे सुरू आहे. विशेष म्हणजे गेल्या पंचवीस वर्षांत या कार्यासाठी निधीची कमतरता भासल्याचे उदाहरण नाही, हीच समाजाच्या विश्वासाची खरी पावती म्हणावी लागेल.

या कार्यातील सर्वांत प्रेरणादायी बाब म्हणजे त्यांनी स्वीकारलेली पर्यावरणपूरक अंत्यसंस्कार पद्धती. पारंपरिक पद्धतीत मोठ्या प्रमाणावर लाकडाचा वापर केला जातो. मात्र येथे चितेचा फक्त पहिला स्तर दोन ते अडीच मण लाकडाचा असतो आणि उर्वरित संपूर्ण चिता शेणाच्या गोवऱ्यांनी तयार केली जाते. त्यामुळे वृक्षतोड कमी होते, पर्यावरणाचे संरक्षण होते आणि अंत्यसंस्कार अधिक पर्यावरणस्नेही बनतात. या उपक्रमाचा आणखी एक सकारात्मक पैलू म्हणजे 'रोजगारनिर्मिती'. शेणाच्या गोवऱ्या तयार करणाऱ्या ग्रामीण भागातील महिला आणि शेतकरी यांच्याकडून या गोवऱ्या खरेदी केल्या जातात. त्यामुळे 'पर्यावरण संवर्धनाबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही' हातभार लागतो. 'समाजोपयोगी कार्य आणि रोजगारनिर्मिती' यांचा असा सुंदर संगम क्वचितच पाहायला मिळतो.

ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सुरुवातीच्या काळात विविध ठिकाणी जाऊन अभ्यास केला. कोल्हापूरमध्ये सुरू असलेल्या अशाच प्रकारच्या उपक्रमांची माहिती घेतली. आजही या सेवेसाठी लागणाऱ्या शेणाच्या गोवऱ्या कोल्हापूरमधूनच उपलब्ध करून घेतल्या जातात. एखादा उपक्रम यशस्वी होण्यासाठी त्यामागे किती 'अभ्यास, चिकाटी आणि समर्पण' लागते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

विशेष कौतुक वाटले ते 'स्मशानभूमीच्या व्यवस्थापनाचे'. सामान्यतः स्मशानभूमी म्हटले, की दुर्लक्षित आणि अस्वच्छ परिसर डोळ्यांसमोर येतो. पण येथे चित्र पूर्णपणे वेगळे आहे. संपूर्ण परिसर स्वच्छ, सुबक आणि हिरवाईने नटलेला आहे. विविध प्रकारची झाडे लावल्यामुळे सावली निर्माण झाली आहे. अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांना थांबण्यासाठी स्वच्छ आणि शांत वातावरण उपलब्ध होते. येथे एक सुसज्ज सभागृहही उभारण्यात आले आहे. श्रद्धांजली सभा, शोकसभा किंवा अन्य आवश्यक कार्यक्रम सन्मानपूर्वक पार पाडण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे दुःखाच्या प्रसंगीही कुटुंबीयांना सुसंस्कृत आणि व्यवस्थित वातावरण लाभते. एखाद्या व्यक्तीला अंतिम निरोप देताना परिसरातील स्वच्छता, हिरवळ आणि शांतता यामुळे मनाला वेगळाच दिलासा मिळतो. येथे केवळ अंत्यसंस्कार होत नाहीत, तर माणुसकी पर्यावरणप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांचे दर्शन घडते. अंतिम प्रवासही सन्मानाने आणि संवेदनशीलतेने व्हावा, यासाठी घेतले जाणारे हे प्रयत्न निश्चितच वाखाणण्याजोगे आहेत.

या सेवाकार्यातील संस्थेचे सध्याचे अध्यक्ष नंदकिशोर भुतडा व त्यांच्या नेतृत्वात कार्यरत असलेले कार्यकारी मंडळ, संचालक, कर्मचारी आणि स्वयंसेवक यांचा सेवाभाव विशेष उल्लेखनीय आहे. आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता समाजातील दुःखाच्या क्षणी आधार देण्याची त्यांची वृत्ती प्रेरणादायी आहे. अनेक संस्था विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत; परंतु माणसाच्या अंतिम प्रवासातही सहकार्याचा हात पुढे करणारी, पर्यावरणाचे रक्षण करणारी आणि स्मशानभूमीला सुद्धा एक सुसंस्कृत, स्वच्छ व प्रसन्न स्वरूप देणारी संस्था विरळाच आढळते. जवाहरलालजी छाबडा यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले हे कार्य म्हणजे 'सहकार, सेवा, संवेदनशीलता आणि सामाजिक उत्तरदायित्व' यांचा सुंदर मिलाफ आहे. त्यांच्या या कार्याची माहिती समजल्यानंतर त्यांच्याविषयीचा आदर अधिकच वाढला.

चाणक्य अंत्यसंस्कार सेवा संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर भुतडा, सर्व संचालक, कर्मचारी, कार्यकर्ते आणि या सेवायज्ञाला हातभार लावणारे सर्व दानशूर नागरिक यांना 'मनःपूर्वक मानाचा प्रणाम' माणुसकीची ही ज्योत अशीच अखंड तेवत राहो आणि समाजाला प्रेरणा देत राहो, हीच मनापासून सदिच्छा!

– शरद जाधव. मो.नं.– ९४२२७६१६९८ ***




# अडचणीतील साखर कारखान्यांच्या विलीनीकरणाबाबत सहकार धोरण असावे

भारतातील सहकार चळवळ ही सामाजिक परिवर्तनाची खूप मोठी ताकद आहे. ग्रामीण भारतात उद्योग व्यवसाय, बाजारपेठ, रोजगार शिक्षण, आरोग्य सुविधाबाबत वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. विशेष करून महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने या बाबत अग्रगण्य राहिले असून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोलाची साथ दिली आहे व देत आहेत.



**साहेबराव खामकर**
**९६२५३ ४३४३४**

भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने बदलत असून सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकरी कामगार, नागरिक, महिला लघुउद्योजक, व्यावसायिक यांचे दैनंदिन आर्थिक व्यवहारात परिवर्तन घडून येत आहे. सर्वांच्या सहभागातून सर्वांचा विकास हेच तर सहकाराचे मर्म असून केवळ नफा मिळविणे हाच एकमेव उद्देश नसून सर्व सभासदांचे व समाजाचे आर्थिक सक्षमीकरण व प्रगती हेच उद्दिष्ट असते आणि त्यामुळेच ग्रामीण भागातील जनसामान्यांना व आर्थिक दुर्बल घटकांना प्रवाहात आणण्यास सहकार यशस्वी ठरला आहे.

एकेकाळी भारत देशात ज्या वेळी पाचशे सहकारी साखर कारखाने सुरू होते, त्यापैकी सुमारे दोनशे सहकारी साखर कारखाने महाराष्ट्रात होते. सहकारी साखर कारखाने हे राज्याचे ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी प्रभावी माध्यम होते. आज आपण ग्रामीण भागातील जी अद्ययावत शाळा, महाविद्यालये, तंत्रनिकेतने, वैद्यकीय महाविद्यालये, तांत्रिक विद्यालये, ग्राहक भांडार, कामगार पतपेढी, शिक्षण संस्था, मंगल कार्यालये, नाट्यगृह आदी सोईसुविधा पाहत आहोत, ते केवळ आणि केवळ सहकारी साखर कारखान्यांमुळेच शक्य झालेले आहे. परंतु, कालांतराने सहकारामध्ये आलेला व्यवस्थापनामधील पारदर्शकपणाचा अभाव, कामकाजातील अनियमितपणा, शिस्त व नियोजनाचा अभाव, आर्थिक गैरव्यवहार, वाढती स्पर्धा, कायद्याचे बंधन, तांत्रिकतेचा अभाव यांसह परिपक्व नेतृत्वाचा अभाव अशा अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे सहकारी साखर कारखान्यांना ग्रहण लागले व अनेक सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीत येऊ लागले व बंद पडले व पुढे पर्यायाने संबंधित बँकांनी ते कारखाने जप्त करून त्यांची विक्री केली व ते खासगी तत्त्वावर चालविले जाऊ लागले. त्यामुळे तेथील कामगार व शेतकरी यांची देणी तशीच थकीत राहिली व पुढे त्या कारखान्यातील कामगारांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. जे काही बंद सहकारी साखर कारखाने भाडेतत्त्वावर, सहयोगी तत्त्वावर अथवा दीर्घ मुदतीच्या कराराने चालविण्यास दिले आहेत, त्यापैकी एखादाच अपवाद वगळता कोणत्याही कारखान्याचा करार पूर्ण होईपर्यंत कारखाना चालविण्यात आल्याचे तसेच करारानुसार सर्व अटी-शर्तींचे पालन झाल्याचे दिसून येत नाही.

सहकारी साखर कारखान्यांची संख्या राज्यात शंभरीत आली असल्याचे दिसून येते. तशातच महाराष्ट्र शासनाने सन २००३ पासून नवीन सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी बंद केल्यामुळेही नवीन सहकारी साखर कारखाने राज्यात निर्माण होत नाहीत.

सध्या राज्यात सुमारे शंभर सहकारी व शंभर खासगी साखर कारखाने कार्यरत आहेत.

ज्या सहकारी साखर कारखान्यांची विक्री होते तेथील कामगारांचा पगार, भविष्य निर्वाह निधी, शेतकऱ्यांचे ऊस पेमेंट इ. बाबी थकीत तर राहतातच परंतु महत्त्वाचे म्हणजे कामगारांच्या रोजगाराचा, निवासाचा प्रश्न निर्माण होतो व कुटुंबांची गैरसोय होते.

अशाच प्रकारे एखादी सहकारी बँक जर अडचणीत येऊन बंद पडली किंवा पडणार असेल, तर त्या बँकेचे दुसऱ्या एखाद्या सक्षम सहकारी बँकेत विलीनीकरण करून तेथील सभासद, खातेदार यांचे हित जपले जाते. एकट्या कॉसमॉस बँकेत इतर एकोणीस बँकांचे विलीनीकरण करण्यात आल्याचे उदाहरण आहे.

त्याच धर्तीवर आता राज्याचे जे नवीन सहकारी धोरण ठरत आहे, त्यामध्ये जर सध्या जे काही सहकारी साखर कारखाने आर्थिक अथवा अन्य काही अडचणीमुळे बंद आहेत किंवा जे सध्या तोट्यात आहेत व पुढे जाऊन बंद पडून पुन्हा विक्री केले जाणार आहेत, असे कारखाने इतर इच्छुक सहकारी साखर कारखान्यांमध्ये विलीनीकरणाबाबत कायद्याचा योग्य त्या कलमांसह नवीन सहकार धोरणात समावेश करण्यात यावा, जेणेकरून कारखान्याची स्थावर व इतर मालमत्ता, यंत्रसामग्री सहकारी साखर कारखान्याच्या मालकीची राहील. सभासदांचे भाग हक्क तसेच कामगारांचा रोजगार कायम राहील व कारखाना शेतकऱ्यांच्याच मालकीचा राहील व सहकारी तत्त्वावरच चालेल. आजही काही सहकारी साखर कारखाने खूपच चांगली कामगिरी करीत असून आर्थिकदृष्ट्या सुदृढ आहेत. काही सहकारी साखर कारखान्यांचे चारपर्यंत युनिट (शाखा) आहेत.

सहकार हे राज्याचे वैभव आहे. ते जपले पाहिजे व टिकले पाहिजे. बिना संस्कार नहीं सहकार व बिना सहकार नहीं उद्धार या सहकार भारतीच्या घोषवाक्याचे अनुकरण केल्यास महाराष्ट्रातील सहकार निश्चितच पुन्हा उभारी घेईल.

**– साहेबराव खामकर**

**साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश**

**मो. नं. – ९६२५३४३४३४** *****

# सायबर फसवणूक टाळण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी कायम सावध राहावे -आजगावकर

दि कल्याण जनता सहकारी (मल्टीस्टेट शेड्युल्ड )बँकेच्या वतीने सहकार सप्ताहा निमित्त सायबर गुन्ह्यापासून संरक्षण या जनजागृती पर माहितीपूर्ण कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून पोलीस निरीक्षक सुदेश वसंत अजगावकर, सायबर पोलीस स्टेशन ठाणे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. बँकेच्या वतीने अध्यक्ष अॅड. संपदा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बँकेचे कार्यकारी संचालक अनंत कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. आजगावकर यांनी त्यांना अनुभवास आलेली अनेक उदाहरणे देऊन ज्येष्ठ नागरिकांनी काय काय करायला हवे याबाबत मार्गदर्शन केले.

सायबर सिक्युरिटी बाबत बँकेची भूमिका व तयारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी मांडली. बँकेचे उपाध्यक्ष महेश देशपांडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला कल्याण येथील ज्येष्ठ नागरिक, आजी-माजी संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रश्नोत्तरे देखील झाली.




कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. कार्यक्रमाचे नियोजन उपमहाव्यवस्थापक सुनील भोईर व सरव्यवस्थापक मिलिंद फाटक यांनी केले. सूत्रसंचालन दिव्या दरेकर यांनी केले.

# नागरी सहकारी बँकेतील ग्राहक सेवा

देशातील नागरी सहकारी बँका उत्तम ग्राहक सेवेसाठी ओळखल्या जातात. बँकिंगचा स्थूल मानाने इतिहास पाहिल्यास, बँकिंगमध्ये सातत्याने बदल होत आहेत. सन १९६९ या वर्षातील पहिले राष्ट्रीयीकरण, तर १९८० मधील दुसरे राष्ट्रीयीकरण, सन १९९० पासून सुरू झालेले जागतिकीकरण, त्याचा परिणाम म्हणून १९९१-९२ पासून खासगी बँकांचा उदय संगणकीकरण आणि गेल्या दशकातील डिजिटल सेवांचे वास्तव या बँकिंगमधील मागील काही वर्षांतील महत्त्वाच्या घडामोडी आहेत. नागरी सहकारी बँकांवर या सर्व घडामोडींचा त्या त्या काळाप्रमाणे परिणाम झालेला आहे.

**❊ सेवांचे वेगळेपण –**

बँकिंगमध्ये वर उल्लेख केलेल्या स्थित्यंतरामुळे बँकिंगमधील स्पर्धा तीव्र झाली. राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या शाखा तालुका पातळीपर्यंत सुरू करण्यात आल्या. सरकारचे भक्कम पाठबळ असल्यामुळे मूलभूत सोयी, पुरेसा कर्मचारी वर्ग, कर्ज मंजुरीचे व्यापक अधिकार सहकारी बँकांसाठी स्पर्धेच्या होत्या.



**डॉ. अभय मंडलिक**
**९४०३० ८०७२५**

सन १९९० च्या उदारीकरणानंतर बँकिंग क्षितिजावर आलेल्या खासगी बँका व्यापक तंत्रज्ञानासह संगणकीकृत सेवांसह आल्या होत्या. या संपूर्ण काळात नागरी सहकारी बँका अस्तित्वात होत्या. झालेला बदल त्यांनी व्यवस्थित आत्मसात केला आणि स्पर्धेमध्ये टिकून राहिल्या. त्याचे एकमेव कारण त्या देत असलेली ग्राहक सेवा होय. स्थानिकत्व, खातेदारांशी अनेक दशकांपासून असलेले मधुर संबंध स्थानिक लहेजासह बोलणारा कर्मचारी वर्ग, खातेदारांच्या गरजांनुसार असलेले कर्ज आणि ठेवीचे प्रकार, नागरी सहकारी बँकांचे आस्तित्त्व अन्य बँकांच्या तुलनेत वेगळेपणाचे दिसून येत असे. सकाळ संध्याकाळ सुरू असलेल्या शाखा, उशिरापर्यंत दिली जाणारी ग्राहक सेवा या वैशिष्ट्यांमुळे नागरी सहकारी बँका आजही प्रखर स्पर्धेला तोंड देत भक्कम पायावर वाटचाल करीत आहेत.

**❊ ग्राहक सेवेचे महत्त्वाचे घटक –**

ग्राहक सेवेमध्ये काउंटरवरील कर्मचारी, अधिकारी वर्ग हा सर्वात महत्त्वाचा आणि जमेचा घटक आहे. खातेदार सर्वप्रथम काउंटरवरच जातो. काउंटरवर त्याच्याशी व्यवस्थित बोलणे, त्याची गरज किंवा अडचण समजून घेणे आणि त्याला योग्य सल्ला देणे हा ग्राहक सेवेचा महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये भाषा हा घटक महत्त्वाचा आहे. स्थानिक भाषेत बोलणारे कर्मचारी, अधिकारी हा नागरी सहकारी बँकांचा हुकूमी एक्का (USP) आहे. उत्तम प्रकारे ग्राहक सेवा दिली जाण्यासाठी काउंटरवरील कर्मचारी, अधिकारी वर्गाला ठराविक अंतराने प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. बँकिंगमध्ये नव्याने येत असलेले तंत्रज्ञान ग्राहकांसाठी असलेल्या डिजिटल सेवा, ठेवी आणि कर्जांच्या विविध योजना, निधी हस्तांतरणाच्या सुविधा, लॉकर्स आणि अन्य सेवा याबाबतची परिपूर्ण माहिती कर्मचारी, अधिकारी यांना असणे आवश्यक आहे. यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळी प्रशिक्षण देणे, आता गरजेची बाब झाली आहे.

माहिती देण्याची पद्धत नम्र असावी, भाषेची, शब्दांची निवड बिनचूक असावी. अतितांत्रिक शब्द वापरले जाऊ नये, या बाबीही प्रशिक्षणाचा भाग असाव्यात. ग्राहकांच्या विविध शंकांना न कंटाळता नम्रपणे उत्तर देणे काउंटरवरील कर्मचारी, अधिकारी वर्गासाठी अत्यावश्यक आहे. वयोवृद्ध नागरिक, विकलांग व्यक्ती, अंध व्यक्ती या प्रकारच्या ग्राहकांची अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

**❊ बँकांमधील अंतर्गत व्यवस्था –**

आलेल्या ग्राहकास बँकांमधील वातावरण प्रसन्न वाटले पाहिजे, अशा प्रकारची अंतर्गत व्यवस्था असावी. उत्तम प्रकाश व्यवस्था हा महत्त्वाचा घटक आहे. बसण्यासाठी पुरेशी जागा लिहिण्यासाठीचे टेबल्स आणि पेन, नियमितपणे लागणारी स्टेशनरी (उदाहरणार्थ पैसे भरण्याचे फॉर्म पैसे काढण्याचे फॉर्म) योग्य पद्धतीने ठेवण्यात आलेली असावी. वयोवृद्ध ग्राहकांसाठी सर्व कामांसाठी एक खिडकी योजना (Single Window System) असावी. कामासाठी त्यांना फार काळ उभे राहावे लागू नये अशी व्यवस्था असली पाहिजे. अशीच विशेष व्यवस्था विकलांग व्यक्तींसाठी असावी. दर्शनी भागात रॅम्प असणे रिझर्व बँकेच्या सूचनेप्रमाणे आवश्यक आहे. अंतर्गत नोटीस बोर्डावर कोणत्याही जुन्या नोटीसा नसाव्यात हे नियमितपणे बघितले गेले पाहिजे. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे सेवाशुल्क, कामकाजाच्या वेळा इत्यादी माहिती ठळक पद्धतीने प्रादेशिक भाषेत असावी.

**❊ एटीएम कक्षा बाबत –**

एटीएम कक्षामध्ये परिचालना बाबतच्या योग्य सूचना असाव्यात. अडचण आल्यास कोणाशी संपर्क साधावा, ते फोन क्रमांक असावेत. एटीएम कक्ष दर तासानंतर स्वच्छ केला जाईल, अशी व्यवस्था करावी अस्वच्छ एटीएम कक्षामुळे बँकेची प्रतिमा खराब होत असते. एटीएम कक्षात अन्य बँकांचे खातेदार देखील येत असतात, या पार्श्वभूमीवर ही स्वच्छता अत्यावश्यक आहे.

**❊ बँकेचा दर्शनी भाग –**

बँकेचे दर्शनी भागातील व अन्य सर्व बोर्ड ठराविक अंतराने स्वच्छ केले जावेत. रात्रीच्या वेळी त्यावर पुरेसा उजेड असेल अशा पद्धतीची व्यवस्था असावी. एटीएमचा बोर्ड दूर अंतरावरूनही दिसेल अशा पद्धतीने असावा. रात्रीच्या वेळी त्यावर प्रकाशाची व्यवस्था असावी. दर्शनी भागाची साफसफाई रोज केली जावी. खातेदाराच्या वाहन पार्किंगची योग्य व्यवस्था असली पाहिजे.

**❊ कॅशियर, टेलरकडून अपेक्षित सेवा –**

रोखीसंबंधी सर्व व्यवहार जोखमीचे असतात. कॅशियरच्या केबिनला योग्य ते संरक्षण असावे. कॅशियरच्या पाठीमागे असलेले दार आतून बंद करण्याची सोय असली पाहिजे. नोट काउंटिंग मशीन सुरू असली पाहिजेत. खातेदाराला मोजलेल्या नोटा दिसतील अशी व्यवस्था असावी. शक्यतो खातेदारांच्या मागणीनुसार नोटा देण्याचा प्रयत्न असावा. नोटा देताना रिझर्व बँकेच्या क्लीन नोट पॉलिसीचा परिपूर्ण विचार करावा. कॅशियर, टेलर यांच्याकडे सर्वात जास्त ग्राहक जात असतात. त्यामुळे या कर्मचारी वर्गाची भाषा मृदू असावी. सेवा देताना त्यांनी खातेदारांची पुरेशी काळजी घेणे आवश्यक आहे. खूप गर्दीच्या ठिकाणी टोकन पद्धत असायला हरकत नाही. माहितीसाठी May I Help You हे काउंटर असावे. या काउंटरवरील कर्मचारी प्रशिक्षित असावा त्याची भाषा मृदू असणे आवश्यक आहे. ग्राहकांना त्यानी योग्य माहिती देणे अपेक्षित आहे.

बँकांना सध्या राष्ट्रीयीकृत बँकांसोबत खासगी बँका स्मॉल फायनान्स बँका, प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्पर्धा आहे. ग्राहक सेवा हा एकमेव मुद्दा असा आहे. ज्यामुळे ग्राहक आपल्याकडे येतील आणि टिकूनही राहतील. तरुण ग्राहकांना बँकेत येणे फारसे आवडत नाही. ऑनलाइन बँकिंग वर त्यांचा भर असतो. या ग्राहकांना मित्रत्त्वाची वागणूक दिली जावी. सोबतच ऑनलाईन बँकिंगबद्दल परिपूर्ण माहिती देणे अपेक्षित आहे.

शाखा पातळीवर देण्यात येणाऱ्या ग्राहक सेवाबाबत वरिष्ठांनी लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. यामध्ये काउंटरवरील कर्मचारी, अधिकारी वर्गाचे ज्ञान, सेवांबाबत त्यांना असलेली माहिती, यासोबतच योग्य भाषा आणि शब्दांचा अचूक वापर याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. ग्राहकांमुळे बँकेचे अस्तित्त्व आहे, हे सर्वांनी कायम लक्षात ठेवले पाहिजे.


**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.)**


*****

# सहकारातून समृद्धीच्या दिशेने...

आपल्या संस्कृतीमध्ये एकोप्याने राहण्याची मोलाची शिकवण आहे. 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे', या कवितेमध्ये हीच शिकवण आहे. मदत म्हणजे सहाय्य केल्याने काम करणाऱ्याच्या खांद्यावरील भार कमी केला जाईल. अशी भावना असते. यालाच सहकार्य म्हणतात. सहकार्यातून केला जाणारा सहकार सर्वत्र दिसतो. त्याच सहकाराचा ध्यास घेऊन सरकार देशाचे चित्र बदलायच्या प्रयत्नाला प्राधान्य देत आहे. सहकार वाढेल तसतशी खेडी सुधारतील, अशिक्षीत शिक्षीत होतील, राहणीमान उंचावेल, मनोवृत्तीत सकारात्मक बदल घडेल. त्याने सुखी, समाधानी, आनंदी वृत्तीला नव्याने पालवी फुटून त्यांचा परीघ आणि खोली गावोगावी, घरोघरी वधारलेली होणार आहे. तेच राष्ट्रीय सहकार धोरण आखणी केली आहे. त्यानुसार भारतीय सरकार कामास लागले आहेत. त्याचा पाया 'सहकारातून समृद्धी' विशेषणाने भूषित केला आहे.



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

सहकार सर्व देशांमध्ये आहे. भारत सहकारात अग्रस्थानी आहे, अधिक विस्तारित आहे. सर्व क्षेत्रांमध्ये बदल घडवून समृद्धीच्या मार्गावर वाटचाल करायची आहे. मोठ्या प्रमाणात आणि त्या त्या परिसरात चांगले बदल करण्यास सरकार प्रयत्नशील आहे. सर्वांची उत्तम साथ अपेक्षित आहे. त्यानुसार योजनांची आखणी केली जाताना दिसते. कार्य सुरू झाले होते. त्यामुळे उत्पन्नात वाढ होऊ लागलेली दिसू लागली आहे.

केंद्र सरकारने सहकारास जिथे जिथे आवश्यकता असेल तिथे आर्थिक योग्य रकमेचे पाठबळ देऊन प्रयत्नांते उत्तम घडी बसवणे चालू केले आहे. केंद्रा पाठोपाठ इतर राज्यांनी त्याचीच री ओढत आपापल्या राज्यांमध्ये बदलाच्या प्रक्रियेचा स्वीकार करून कामास सुरूवात करीत आहेत. विविध सेक्टर्समधील कमतरता भरून काढताना बारकाईने पाहणी करणे आवश्यक असते. महाराष्ट्र सहकार ते करण्यात अग्रेसर आहे. अधिकांश प्रयत्न महाराष्ट्रात केले गेले, चालू आहेत. सरकारने स्वतंत्र राज्य सहकार धोरण तयार केले. नवीन टेक्नॉलॉजीचा अधिक वापर, डिजीटायझेशन, व्यावसायिक व्यावस्थापन, महिला व तरुणाईचा वाढता सहभाग, कृषी विकास, कौशल्य विकास, प्रशिक्षण, पर्यावरण रक्षण, पर्यटन, दुग्ध व्यवसाय, बँकिंग, गृहनिर्माण, मत्स्य व्यवसाय, अन्नोत्पादन, विविध उद्योग यामध्ये वाढ इ. या व इतर सर्वांचा समावेश आहे.

राष्ट्रीय सहकारी धोरण २०२५ (National Cooperation Policy 2025) लागू केले आहे. देशास स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तरी साजरी केली गेली. आता सरकारचे लक्ष शंभरीवर केंद्रित झाल्याने नव्या धोरणाची रूपरेखा आखली गेली. विकसित भारत २०४७ शताब्दी वर्षी असणार आहे. तो साजरा करताना काय काय केलेले असायला हवे या ध्येयाने देशाचा विकास करायचा सुंदर मानस प्रत्येक भारतीयांच्या मनात पेरला जात आहे. सहकार तंत्रानुसार चालवलेले कार्य याच्या आधारावर सर्व दिशांनी देशाची व्यावसायिक आर्थिक परिस्थिती व शक्ती वृद्धी अपेक्षित आहे. त्यासाठी प्रयत्न, सुधारणा, उत्पादन आर्थिक सुधार, उत्तम नफा, अशी समावेशक प्रगती त्यात असेल. समाज, उद्योजक, सूक्ष्म व लहान अशा सर्वांनाच योजनेच्या परिघात घेतले असल्याने सर्वांनीच प्रयत्न सुरू केलेले दिसतात. धोरणाने आत्मविश्वास ठासून दिलेला आहे. आखणी करताना छोट्या छोट्या गावांपासून सहकार शोधून पाठबळ देऊन सर्व प्रकारे उन्नती करायचीच असे ठरवले आहे. त्यास नाव दिले आहे, सहकारातून समृद्धी!

देशामध्ये डिजिटल क्षेत्रामध्ये वैविध्य आणि आधुनिकीकरण करण्यावर भर दिला जाणार आहे. यामध्ये डिजिटल व्यवहार, ऑनलाईन आर्थिक देवाणघेवाण, इ-गव्हर्नन्स, इ-व्यवस्थापन, इ-मार्केटिंग, असा इ सर्वत्र समाविष्ट आहे. यामध्ये तरुणाईचा मोलाचा सहभाग असणार आहे. नवीन तंत्रज्ञानी हुशार शिक्षित एक्स्पर्ट तरुण वर्ग देशाचा कायापालट करतील. त्यास अत्यावश्यक शैक्षणिक सुविधा असणे महत्त्वाचे असतील असे वाटते.

'सहकारातून समृद्धी' ही संकल्पना योग्य वाटते, तिथे छोट्या छोट्या गोष्टीत सहकारवृद्धी झाल्यावर प्रत्येक बाबतीत उत्तम बदलाव येणार यावर खात्री वाटते. त्याच दृष्टीने वाटचाल आखली आहे. विशेष म्हणजे सहकार मंत्रालयाने केलेले काम आणि आखलेला भविष्यातील आराखडा अहं भूमिका बजावतात. इथे लोकसहभाग, समाजजागृती, डिजिटल परिवर्तन, पारदर्शकता, स्वच्छ व्यवहार आणि योग्य व्यवस्थापन, यांचा उत्तम दर्जा पाहिजे.

कागदोपत्री बरेच काही लिहिले आहे, वाचनात आले. सुरुवात मात्र नक्की झालेली आहे. त्यास अधिकाधिक समाजाचा पाठिंबा, तरुणाईचा सहवास व वावर याची गरज आहे. एकोप्याने कामे वाढली पाहिजेत. कामाच्या प्रकारानुसार मंडळी एकत्रितरीत्या बरेच काही पटीपटीने वाढवू शकते. त्यासाठी सरकारकडून प्रशिक्षणाची देखील सोय केलेली वाचनात आहे. चौकशी करायला हरकत नाही. जिथे प्रशिक्षण असेल तिथे जाऊन आपली उन्नती करायची ही चालून आलेली सुवर्णसंधी शहाण्याने सोडू नये. हेच लक्षात ठेवावे, संधी पकडायची असते, तीच संधी दार ठोठावीत आहे. शुभेच्छा!

**– वंदना धर्माधिकारी, मोबाइल – ९८९०६ २३९१५**
**ईमेल** – vandana10dyahoo.co.in

*****

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

**संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा**

Payment Getway link

**भारतात कुठेही**
**निश्चित अंक मिळण्यासाठी**
**मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर**

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

## जनसेवा सहकारी बँकेचा सदस्यांना लाभांश ९ टक्के जाहीर

**पुणे –** येथील जनसेवा सहकारी बँकेच्या वतीने सदस्यांना ९ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेची ५४वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील निर्णय जाहीर करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष पोळेकर यांनी वार्षिक ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक सभेला सादर केले. सध्या एकूण ठेवी २,०८१.३८ कोटी असून कर्ज वाटप १,१५८.८७ कोटी इतके आहे तर एकूण व्यवसाय ३२४०.२५ कोटी झाला आहे बँकेला १४.११ कोटी नफा झाला असून सध्या मुख्य कार्यालयासह २८ शाखा कार्यरत आहेत, अशी माहिती बँक अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी सांगितली.

## साधना सहकारी बँकेला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान

**पुणे –** येथील साधना सहकारी बँकेला सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट आणि गतिमान कामगिरी, ग्राहकाभिमुख सेवा आणि आर्थिक शिस्त व पारदर्शक कामकाज याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम नागरी सहकारी बँक हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

बँक अध्यक्ष वंदना काळभोर यांनादेखील यावेळी सर्वोत्तम अध्यक्षा या पुरस्काराने गौरविण्यात आले. लखनौ येथे झालेल्या बँकांच्या राष्ट्रीय परिषदेत पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँकेचे संचालक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## उगार शुगर वर्क्सचे माजी अध्यक्ष राजाभाऊ शिरगावकर यांचे निधन

**कोल्हापूर –** येथील उगार शुगर वर्क्सचे माजी अध्यक्ष आणि साखर उद्योगाचे कृतिशील मार्गदर्शक उद्योजक राजाभाऊ शिरगावकर यांचे नुकतेच निधन झाले. ते ९२ वर्षाचे होते.

देशातील साखर उद्योगासमोरील आव्हाने त्यांचा अभ्यास, तांत्रिक आधुनिकीकरणाला प्राधान्य, शेतकरी आणि उद्योग यांच्यातील परस्परालंबी नात्याची जाणीव, जागतिक स्पर्धा, या पार्श्वभूमीवर उद्योगाची फेररचना यावर त्यांचा विशेष भर होता. संस्था ही केवळ उद्योगसमूह न राहता ऊस उत्पादक तंत्रज्ञ, संशोधक व्यवस्थापक, कामगार यांना एकत्र आणणारे विकासाचे केंद्र व्हावे, असा त्यांचा प्रयत्न होता. तसेच साखर उत्पादनाबरोबर अन्य उपपदार्थ निर्मितीवर भर देण्याचा निश्चय होता.

## राजर्षी शाहू सहकारी बँक एनपीए व्यवस्थापन पुरस्काराने सन्मानित

**पुणे –** राजर्षि शाहू सहकारी बँकेला नुकतेच देश स्तरावरील एनपीए व्यवस्थापन पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. लखनौ येथील राष्ट्रीय परिषदेत पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि आसाम स्टेट को-ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष आमदार विश्वजित फुकन यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

बँकेचे अध्यक्ष पद्माकर पवार तसेच संचालक यांनी पुरस्कार स्वीकारला. बँकेच्या सध्या १४ शाखा कार्यरत असून नव्याने ५ शाखा सुरू करण्यास आरबीआयने परवानगी दिली आहे. एकूण ठेवी १ हजार ८७ कोटी असून ६०० कोटींचे कर्जवाटप करण्यात आले आहे तर एकूण व्यवसाय १ हजार ६८७ कोटी झाला आहे.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या;
### (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) - ९४०३० ८०७५१**
**श्री. उदय पेंडसे (संचालक) - ९८६९० ३४६६२**

*** प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ **ई-मेल –** sahakarprashikshan@gmail.com

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

वारसा विश्वासाचा

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | फोन : 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurban.bank.in

# अमृत वर्षा

## पुनर्गुतवणूक ठेव योजना

**6.60%*** योजनेचा सामान्य व्याजदर

**7.10%*** जेष्ठ नागरिकांकरिता व्याजदर

गुंतवणूक कालावधी **444 दिवस**

अंतिम तारीख - **31 मार्च 2027 पर्यंत**



**डॉ. नितीन खर्चे**
अध्यक्ष

**अजिंदरसिंह चावला**
उपाध्यक्ष

**श्रीधर कोहरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**- संचालक -**

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 9867678092 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव (लेखक) | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन (अनिल दोशी) | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण (डॉ. अभय मंडलिक) | १२५/- |

| क्र. | पुस्तकाचे नाव (लेखक) | किंमत |
|---|---|---|
| ४ | बँकिंग साक्षरता (गणेश निमकर) | ३५०/- |
| ५ | सरकारी कर्जरोखे (जयंत काकतकर) | २५०/- |
| ६ | गोष्ट साखरेची (साहेबराव खामकर) | ७५/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

**सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-**
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 07801110000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**


/chandrapururban
चंद्रपूर अर्बन मल्टीस्टेट
स्वप्नपूर्तीची नवी दिशा,
हीच आमची ध्येयपूर्तीची परंपरा!
मासिक ठेव योजना
निवृत्तीनंतर मिळवा दरमहा लाभदायी रक्कम घरबसल्या
मुदत ठेव योजना
ठराविक दिवसांच्या लाभदायी गुंतवणुकीवर करा भविष्य सुरक्षित
अधिक माहितीसाठी आजच जवळच्या शाखेस संपर्क साधा.
20+ शाखा • 500000+ समाधानी ग्राहक
चंद्रपूर अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., चंद्रपूर
मुख्य कार्यालय : सदाशिव चेंबर्स, अभय टॉकीज जवळ, बालवीर वॉर्ड, चंद्रपूर 442401. (Regd. No.MSCS/CR/1123/2014)
शाखा विस्तार : • चंद्रपूर (अभय टॉकीज जवळ) • तुकूम (ताडोबा रोड) • वरोरा • सावली • राजुरा • यवतमाळ (आर्णी रोड) • यवतमाळ (मेन लाईन) • राळेगाव (यवतमाळ) • पांढरकवडा (यवतमाळ) • वणी (यवतमाळ) • नागपूर (खामला चौक) • मानेवाडा (नागपूर) • हुडकेश्वर (नागपूर) • गोधनी (नागपूर) • पारडी (नागपूर) • अमरावती • हिंगणघाट (वर्धा)
91453 93333 / 07172 259116
chandrapururbanho@gmail.com
www.chandrapururban.com



स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
1995-2025
लोक
मन्सून
योजना 2026
या पावसाळ्यात,
आपल्या गुंतवणुक वाढीला द्या
नवी दिशा.
9.75%
*प्रतिवर्ष
* नियम व अटी लागू, योजना फक्त सभासदांसाठी
मुदत ठेव १८ महिने
किमान ठेव ₹१०,०००/-
वरिष्ठ नागरिक
०.५०%अतिरिक्त व्याज दर
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 lokmanyasociety.org

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**



सोलर लोनची साथ, गृह कर्जासोबत नवा विश्वास,
आता वाढत्या वीज बिलावर करा मात !
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी 2.0) अंतर्गत सबसीडीस पात्र
आपले गृह स्वप्न साकार करणं आता होईल सोपं !
गृहकर्ज व्याजदर
7.90%*
पासून पुढे
(सिबिल आधारित व्याजदर)
गृहकर्ज घेतलेस रुफटॉप सोलर पॅनेल कर्ज व्याजदरसुद्धा
7.90%*
(सिबिल आधारित व्याजदर)
पीएम सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत भारत सरकार सबसिडीस पात्र
नियम व अटी लागू
सांगली अर्बन बँक
कार लोन
8.35%*
पासून पुढे
(सिबिल आधारित व्याजदर)
कार लोनवर व्याजदर कमी, आनंदाची शंभर टक्के हमी !
नियम व अटी लागू
Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास
सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली
(शेड्युल्ड को-ऑप. बँक)
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) २३७६२३६ /३७/३८
मोबाईल : ७८८८००९७१८
अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.




सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित
नागरी सहकारी 2026
बँक / पतसंस्था दैनंदिनी
सहकार भारती
नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश
देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...
नागरी सहकारी बँक दैनंदिनी 2026
नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६
किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!
किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!
नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६
नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी 2026
सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com


50+ YEARS OF MOMENTUM
हर पल PROGRESSIVE
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
From Ambition to Achievement. We're With You Every Step Up.
Study in India or Abroad
Up to ₹50 Lakh*
UG • PG • MBA • Professional Courses
Up to ₹3 Lakh*
Attractive Interest Rates*
Flexible Repayment*
Quick Processing*
Low Processing Fees*
* T&C APPLY
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/07/2026) Posting on 07/07/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

